


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ३५४ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# भाजपकडून निवडणूक प्रमुख ठरले

## बीडमध्ये सुरेश धसांकडे जबाबदारी, पंकजा प्रभारी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील निवडणूक प्रमुख निवडले आहेत. बीड जिल्ह्यातही महत्वाच्या नियुक्त्या केल्या आहेत. बीड जिल्हा निवडणूक प्रमुख पदी आमदार सुरेश धस तर निवडणूक प्रभारी म्हणून मंत्री पंकजा मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर धस -मुंडे वाद पहायला मिळाला होता. मात्र आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये दोघांनाही एकत्रित पक्षाचे काम करावे लागणार आहे.

भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रमुख आणि निवडणुका प्रभारींची यादी पक्षाकडून जाहीर करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा होताच भाजप ॲक्शन मोडवर आले आहे. भाजपकडून जिल्हा निवडणूक प्रमुख आणि जिल्हा निवडणूक प्रभारी यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली आहे.



एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात मंत्री गणेश नाईक यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ठाणे शहर, ग्रामीण, कल्याण, उल्हासनगर, मीरा भाईंदर, भिवंडी, नवी मुंबई या सर्व ठिकाणी गणेश नाईक निवडणूक प्रभारी असणार आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नितेश राणे निवडणूक प्रभारी तर पुणे ग्रामीण मध्ये गणेश बिडकर यांच्यावर निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. तर मुंबईत आशिष शेलार हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यात मंत्री जयकुमार गोरे हे प्रभारी असणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अतुल सावे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. तर नांदेड जिल्ह्यात खासदार अशोक चव्हाण हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यात खासदार धनंजय महाडिक हे निवडणूक प्रभारी असणार आहेत.

## महाआघाडीच्या एकाही प्रश्नाला उत्तर मिळाले नाही : खा. सुप्रिया सुळे



मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगाने अनेक तास ताटकळत ठेवल्यानंतर भेट दिली. आम्ही अनेक तक्रारी केल्या, आरोप केले. त्या बाबचे पुरावे आयोगाला दिले. पण, आयोगाने एक शब्दही उच्चारला नाही. आमच्या प्रश्नांवर आयोगाने मौन व्रत घेतले, असा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (शरद पवार) कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

## आता बोला...




# ७ 'बाहुबली' लढती; राजदचे तेजस्वी यादव, भाजपकडून मैथिली ठाकूरही मैदानातील ओपिनिंग बॅट्समन

**पाटणा : (समर्थ गांवकरी)**

देशाचं लक्ष लागलेल्या बिहारच्या पहिल्या टप्प्यातील १२१ जागांवर ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यातल्या सर्वात महत्वाच्या सात लढती ज्यांच्याकडे सगळ्यांचं लक्ष असेल... ज्यात माजी उमुख्यमंत्री महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार आणि राजदचे सुप्रिमो प्रमुख लालू प्रसाद यादव यांचे पूत्र तेजस्वी यादव, लालूंचेच मोठे पूत्र आणि जनशक्ती जनता दलाचे अध्यक्ष तेज प्रताप यादव, बिहार भाजपमधील सर्वात मोठा चेहरा आणि उपमुख्यमंत्री सम्राट चौधरींसह मैथिली ठाकूर, कॉंग्रेसचा आयआयटी-आयआयएम (IIT-IIM)



पासआऊट शशांत शेखरसारख्या GenZ उमेदवारांचंही भविष्य मतपेटीत बंद होईल. सम्राट चौधरी उपमुख्यमंत्री आणि बिहार भाजपमध्ये सर्वोच्च नेते.. तारापूर मतदारसंघ यादव, मुस्लिम, सवर्ण, कुशवाहा, सह आणि दलित असा मतदारांचा बहुल असल्यानं चांगली टक्कर अपेक्षित आहे. खरंतर इथं गेल्या पाच विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपनं उमेदवार दिलेलाच नाहीय.. सम्राट चौधरी यांचे वडील शकुनी चौधरी यांनी २०१०, २०१५ साली निवडणूक लढवली.. मात्र, त्यांना पराभवच पत्कारावा लागला होता. इथं कायम नितीश कुमाराचा जेडीयू आणि लालू प्रसाद यादवांचा राजदचाच उमेदवार आलटून पालटून जिंकलाय.. २०२१ साली इथं झालेल्या पोट निवडणुकीमध्ये राजदच्या अरुण कुमार शाह यांचा अवघ्या ३८५२ मतांच्या फरकानं पराभव झाला होता.. आणि जेडीयूचा उमेदवार जिंकून आला होता.. आताही तेच अरुण कुमार पुन्हा एकदा राजदचा कंदील हातात घेवून मैदानात उतरलेत.. नितीश कुमारांनी आपला सर्वात महत्वाचा मतदारसंघ भाजपला दिलाय.. आणि सम्राट चौधरी १५ वर्षानंतर विधानसभेची निवडणूक रिंगणात उतरलेत... भाजप, आरजेडी, जेडीयू असा सगळ्यापक्षांमध्ये राजकीय प्रवास करुन झाल्यानंतर २०२३साली ते पुन्हा भाजपमध्ये परतले.. आणि नितीश कुमाराच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री. महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार आणि राजदचे प्रमुख लालू यादव यांचे पूत्र तेजस्वी यादवांचा मतदारसंघ असल्यानं राघोपूर मतदारसंघ आधीच महत्वाचा बनलाय. २०१५ पासून तेजस्वी यादव राघोपूरचे आमदार आहेत.. मतदारसंघ यादव बहुल असल्यानं कायम राजदचाच वरचष्मा राहिलाय.

राजदमधून हकालपट्टी केल्यानंतर लालूचे मोठे पूत्र आणि तेजस्वी यादवांचे मोठे बंधू तेज प्रताप यांनी जनशक्ती जनता दलाची स्थापना केली.. आणि त्यांच्या पारंपरिक मतदारसंघ असलेल्या महुआमधून उमेदावारी अर्जही भरला.. इथली लढत सर्वात जास्त कठीण आणि चर्चेत राहील कारण, २०१५ साली तेज प्रताप यादव महुआचे आमदार बनले.. मात्र, २०२० साली त्यांना हसनपूर आणि त्यांच्याठिकाणी महुआतून मुकेश रोशन यांना उमेदवारी मिळाली.. त्यामुळे २०२० साली तेजप्रताप हसनपूरचे आमदार झाले.. आता राजदच्या त्याच मुकेश कुमार रोशन यांचंच आव्हान तेज प्रताप यांना असणार आहे.

# आमदारांच्या खेळीने भाजपमध्ये संभ्रमावस्था




**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

भाजपला मानणारे शहर अशी ओळख असलेल्या तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार सुनील शेळके यांनी नगराध्यक्षपदासाठी भाजपचे संतोष दाभाडे यांची उमेदवारी जाहीर करून खेळी केली. आमदाराने जाहीर केलेल्या पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा की दुसरा उमेदवार द्यायचा, महायुती करायची की नाही याबाबत भाजपमध्ये संभ्रमावस्था आहे. महायुती झाली नाही, तर आमदारांसोबत असलेले काही भाजपचे पदाधिकारी 'घड्याळावर' लढण्यास इच्छुक नाहीत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस महायुती, की समितीच्या माध्यमातून निवडणूक लढविणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. नगर परिषदेच्या २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपचे १४, शहर सुधारणा समितीचे सहा आणि जनसेवा विकास समितीचे सहा असे बलाबल होते. नगराध्यक्षा म्हणून भाजपच्या चित्रा जगनाडे जनतेतून निवडून आल्या होत्या. नऊ वर्षांत मोठी राजकीय उलथापालथ झाली. भाजपमध्ये असलेले सुनील शेळके दुसऱ्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसकडून आमदार झाले. त्यामुळे राजकीय समीकरणे बदलली आहेत.

# अजित पवार कायम उप असतात : उद्धव ठाकरेंचा टोला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

उद्धव ठाकरे हे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान ते आज शिरसाव गावात होते. तिथे त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. तसंच विकासाच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरे बोलत नाहीत असं जे देवेंद्र फडणवीस म्हणाले त्यावरही उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उत्तर दिलं आहे. तसंच सरकार दगाबाज आहे असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे. आज सकाळपासून मी तुम्हा शेतकरी बांधवांच्या भेटी घेतो आहे आणि सगळ्यांच्या अंगाची लाही होते आहे. मुख्यमंत्री बोलले आहेत की



या निमित्ताने का होईना पण उद्धव ठाकरे घराबाहेर पडले. आता त्यांना उद्या उत्तर देईन. अजून काय म्हणाले की उद्धव ठाकरे फक्त टोमणे मारतात, विकासावर बोललेलं भाषण दाखवा आणि हजार रुपये मिळवा. मग मी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो आज मी शिरसाव गावात राहतो. तुम्ही तुमच्या हेलिकॉप्टरने इथेच या आणि विकासाचं बोला, होऊन जाऊदेत. बरोबर ना? येताना हाडं जागेवर राहिली तर बोला. बंधारे फुटत गेले, चला बोला विकासाचं. मराठवाड्यात पाणी नाही, आलं तर ते थांबतच नाही अशी स्थिती आहे. काय विकासाचं बोलू मी? कुणासमोर बोलू? जो अन्नदाता आपल्याकडे आशेने पाहतो आहे त्याला काय सांगू उद्या पाच पदरी उड्डाण पूल उभा करेन. तुम्ही म्हणाल घाला खड्डयात तो उड्डाण पूल. आत्ता काय करु ते सांग. काय विकासाचं बोलू? यांच्या उद्योगपती मित्रांची कर्जं माफ होत आहेत ते परदेशात पळत आहेत. तुमच्यापैकी एक जण तरी परदेशात पळू शकतो का? कारण माझ्या शेतकऱ्यांची ती वृत्तीच नाही असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. घर सोडून फिरणारे हे मुख्यमंत्री आहे.

## "यांच्याकडून काहीही चांगलं होऊ शकत नाही, तोडफोड..."

# राज ठाकरेंवर श्रीकांत शिंदेंची जोरदार टीका

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवरील नमो केंद्रावरून राज ठाकरे यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदेंनी पहिल्यांदाच त्यांच्यावर टीका केली आहे. हे लोक काहीही निर्माण करू शकत नाहीत, त्यामुळे हे तोडफोडीचीच भाषा करणार अशी टीका श्रीकांत शिंदे यांनी केली. खासदार श्रीकांत शिंदे यांनी पहिल्यांदाच राज ठाकरेंवर थेट टीका केली आहे. राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीचा प्रचार केला होता. धनुष्याबाण असलेल्या मंचावर राज ठाकरे अनेक वर्षांनी दिसले होते. दरम्यान आता श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंबाबत प्रश्न विचारला असता पहिल्यांदाच टीका केली आहे. तसंच उद्धव ठाकरेंच्या मराठवाडा दौऱ्यावरही श्रीकांत शिंदेंनी टीका केली आहे.

उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, "लोकांना कोण खरं कोण खोटं, कोण देणार आहे, कोण घेणार आहे... हे सगळं माहीत असतं. आता अतिवृष्टी झाली त्यावेळेस महायुती सरकारने ३१ हजार कोटीचं पॅकेज दिलं. ज्यावेळेस आमचे कार्यकर्ते शेतकऱ्यांना भेटायला



गेले तर त्यांनी काही ना काही सोबत नेलं होतं. मात्र उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी काहीही केलं नाही. त्यामुळे आता शेतकरी यांच्या दौऱ्याकडे पाठ फिरवत आहेत. आता ते दौरे करत आहेत, निवडणुकीपूर्वी काहीतरी आश्वासने देतील. मात्र लोकांचा विश्वास त्यांच्यावर राहिला नाही. तसंच माझ्याकडे काही नाही हे ते स्वतःच सांगत आहेत." असा टोला श्रीकांत शिंदेंनी लगावला. यानंतर नमो केंद्रांबाबत राज ठाकरेंनी जो इशारा दिला आहे त्याबाबत श्रीकांत शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंवर पहिल्यांदाच टीका करत इतकी आगपाखड कशासाठी करत आहात असा प्रश्न विचारला.

"राज ठाकरे नमो पर्यटन केंद्र फोडण्याचा इशारा देतात, कारण त्यांच्याकडून काहीही चांगलं झालं नाही. हे लोक काही निर्माण करू शकत नाहीत, त्यामुळे हे तोडफोडीचीच भाषा करणार. एवढी आगपाखड करण्याची गरज काय? गड-किल्ल्यांवर फिरायला जाणाऱ्या पर्यटकांना माहिती मिळण्यासाठी ते केंद्र सुरू करण्यात येत आहेत. गडकिल्ल्यांचं किंवा मंदिरांच्या जीर्णोद्धाराचं काम महायुतीने केलं. त्यामुळे नरेंद्र मोदींचे कौतुक करण्याऐवजी ते फोडण्याची भाषा करतात.




# चीननं अंतराळात पाठवली उंदरांची जोडपी

अंतराळात आपलं वर्चस्व स्थापन करण्यासाठी चीननं एका नव्या मोहिमेचा प्रारंभ केला आहे. चीननं शेनझोउ-२१ मोहिमेअंतर्गत आपल्या तियानगाँग अंतरीक्ष स्थानकात तीन प्रवाशांसह उंदरांची दोन 'जोडपी' (चार उंदीर) पाठविले आहेत. त्यांचं हे अंतरीक्ष यान विक्रमी वेगानं तियानगाँगची परिक्रमा करतंय.या मोहिमेत चीनचे अंतराळवीर काही प्रयोगही करणार आहेत. त्यासाठीच त्यांच्याबरोबर या चार उंदरांनाही अंतराळात पाठविण्यात आलं आहे. यातील दोन उंदीर नर आहेत, तर दोन उंदीर मादी. या उंदरांची निवडही कठोर प्रक्रियेतून केली गेली आहे. त्यांना ६० दिवसांचं अतिशय कठीण प्रशिक्षणही दिलं गेलंय. या चार उंदरांनी ३०० उंदरांना हरवून आपली जागा पक्की केली आहे. ही पहिलीच वेळ आहे की चीननं लहान सस्तन प्राणी आपल्या स्पेस स्टेशनवर पाठविले आहेत. चिनी विज्ञान अकादमीचे अभियंता हान पेई यांच्या म्हणण्यानुसार, अंतराळात या उंदरांचं, त्यांच्यावर होणाऱ्या बदलाचं आणि त्यांच्या आचरणाचं अतिशय बारकाईनं निरीक्षण करण्यात येईल. शून्य गुरुत्वाकर्षण आणि बंद वातावरणात त्यांच्या वर्तनावर कसा परिणाम होतो याचाही अभ्यास या प्रयोगात केला जाणार आहे. चिनी वृत्तसंस्था शिन्हुआ आणि चायना नॅशनल रेडिओच्या वृत्तानुसार, या उंदरांवरचा अंतराळातील अभ्यास पूर्ण झाल्यावर 'शेनझोउ २०' या अंतराळ यानातून त्यांना परत पृथ्वीवर पाठविण्यात येईल.



## संपादकीय

या मोहिमेचं वैशिष्ट्य म्हणजे या टीममध्ये पहिल्यांदाच मोहिमेवर जात असलेले अंतराळवीर झांग होंगझांग आणि वू फेई यांचा समावेश आहे. ३२ वर्षीय इंजिनिअर वू फेई हे चीनचे आतापर्यंतचे सर्वांत तरुण अंतराळवीर ठरले आहेत. टीमचं नेतृत्व कमांडर झांग लू करत आहेत, जे दोन वर्षांपूर्वी 'शेनझोउ १५' या अंतराळ मोहिमेचाही भाग होते. या मोहिमेदरम्यान अंतराळवीर २७ वैज्ञानिक प्रयोग करतील, ज्यात जैवतंत्रज्ञान, अंतरीक्ष वैद्यक आणि पदार्थ विज्ञानाशी संबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. झांग होंगझांग हे पेलोड तज्ज्ञ आहेत, जे अंतराळवीर होण्यापूर्वी नव्या ऊर्जेवर आणि नव्या पदार्थांवर संशोधन करीत होते. त्यांच्या आधीच्या अंतराळवीरांप्रमाणेच तेदेखील



साधारण सहा महिने अंतरिक्ष केंद्रात राहतील. तियानगाँग हे चिनी स्पेस स्टेशन चीनच्या अब्जावधी डॉलरच्या अंतरिक्ष कार्यक्रमाचं मुख्य केंद्र आहे. चीन या दशकाच्या अखेरीस आपल्या अंतराळवीरांना चंद्रावर पाठविण्याचा विचार करीत आहे. ही मोहीम म्हणजे त्याच प्रयत्नांचा एक भाग आहे. अंतराळाच्या संदर्भात चीननं अनेक दीर्घकालीन योजना आखल्या आहेत. अमेरिका आणि रशियाच्या अंतरीक्ष कार्यक्रमांना टक्कर देणं आणि अंतराळात जगात सर्वांच्या पुढे राहणं हेही त्यांचं एक प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी गेल्या काही वर्षांपासून चीन अंतराळ मोहिमांवर अब्जावधी डॉलर्स खर्च करतंय. चीननं या मोहिमेदरम्यान एक नवा विक्रमही केला आहे. 'शेनझोउ २१' हे अंतरीक्ष यान अंतरीक्ष स्थानकाशी सहजपणे जोडण्यात आलं. यशस्वी प्रक्षेपणानंतर तीन सदस्यांच्या चालक दलासह हे यान विक्रमी वेगानं चीनच्या स्पेस स्टेशनवर पोहोचलं.

'चायना स्पेस एजन्सी' च्या मते, अंतरीक्ष केंद्राशी जोडण्याची प्रक्रिया केवळ साडेतीन तासांत पूर्ण झाली, जी मागील मोहिमेपेक्षा तीन तासाने कमी आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. २९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | 4 | 3 | 6 | 9 | | 5 |
| | | | 7 | | | 1 | | 4 |
| 2 | | 3 | | | | | | |
| | | 5 | 9 | 6 | | 3 | | |
| | 7 | | | 5 | | | 6 | |
| | | 1 | | 2 | 4 | 7 | | |
| | | | | | | 6 | | 1 |
| 9 | | 6 | | | 8 | | | |
| 1 | | 4 | 6 | 7 | 9 | 2 | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. २८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 8 | 4 | 3 | 6 | 9 | 2 | 5 |
| 5 | 6 | 9 | 7 | 8 | 2 | 1 | 3 | 4 |
| 2 | 4 | 3 | 1 | 9 | 5 | 8 | 7 | 6 |
| 4 | 8 | 5 | 9 | 6 | 7 | 3 | 1 | 2 |
| 3 | 7 | 2 | 8 | 5 | 1 | 4 | 6 | 9 |
| 6 | 9 | 1 | 3 | 2 | 4 | 7 | 5 | 8 |
| 8 | 2 | 7 | 5 | 4 | 3 | 6 | 9 | 1 |
| 9 | 3 | 6 | 2 | 1 | 8 | 5 | 4 | 7 |
| 1 | 5 | 4 | 6 | 7 | 9 | 2 | 8 | 3 |

| पंचांग | संवत्सर - विश्वावसूनाम | नक्षत्र:भरणी ०६:३३:५१ |
|---|---|---|
| ६ नोव्हेंबर २०२५ | अयन- दक्षिणायान | नक्षत्र:कृत्तिका |
| गुरुवार | मास- कार्तिक | २७:२७:३६+ |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु- सौर हेमंत | योग:व्यतीपात |
| श्रावणशके | कृष्ण पक्ष | ०७:०४:२१ |
| संवत्- १९४७ | तिथि:प्रतिपदा १४:५४:५६ | योग:वारीयन |

## उपदेशाचे डोस

### अजरामर

बोधीसत्त्वांचा एक शिष्य होता. बोधीसत्वांनी त्याला आज्ञा केली, 'तू तुझे नाव अजरामर कर'. शिष्याने त्याचे नाव समुद्रकिनाऱ्यावर वाळूत कोरले. परंतु समुद्राला भरती येताच ते नाव लाटेबरोबर वाहून गेले. मग नंतर त्याचे नाव झाडाच्या बुंध्यावर कोरले. काही दिवसांनी एका लाकूडतोड्याने ते झाड तोडले. त्याची लाकडे जाळण्यासाठी वापरली. त्यामुळे नाव जाळले गेले. शिष्याने खूप विचार केला व मोठ्या कष्टाने नाव एका खडकावर कोरले त्याला वाटले आता मात्र नाव अजरामर होणार. पण त्याचे खडकावरचे नावही गेले. कारण अचानक भूकंप झाला व खडक जमिनीत गाडला गेला. तेव्हा मात्र शिष्याचा धीर खचला. निराश मनाने तो बोधीसत्वांकडे गेला व म्हणाला, 'मी खूप प्रयत्न केले पण माझे नाव अजरामर झाले नाही. मला आता काय केले पाहिजे म्हणजे नाव कायमचे राहील? मला मार्ग सांगा' बोधीसत्व म्हणाले, 'तू असे मार्ग हाताळलेस की जे कायम राहणारच नव्हते. जे कायम स्वरूपी राहते ते फक्त जगासाठी केलेले चांगले कार्य. त्या कार्यामुळे तुझे नाव माणसांच्या हृदयावर कोरले जाईल. तिथून मात्र ते कधीच पुसले जाणार नाही आणि त्यासाठी चांगले कार्य शोध व त्यातून तू नाव अजरामर कर' शिष्याने त्या दिवसापासून लोककल्याणाचे कार्य हाती घेतले.

कथा उपदेश : ध्येयाचा ध्यास लागल्यावर कामाचा त्रास वाटत नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१३ - महात्मा गांधी यांना दक्षिण अफ्रिकेत अटक करण्यात आली.
- १९५७ - फिलीक्स गैलार्ड हे फ्रान्सचे पंतप्रधान बनले.
- २००६ - उत्तर चीनच्या शांक्सी प्रांतात एका कोळसा खाणीत गॅस स्फोट होऊन १७ मजूर ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००७ - राजस्थानच्या उच्च न्यायलयात मुख्य न्यायाधीश म्हणून नारायण राय यांची निवड करण्यात आली.
- २००७ - अमिताभ बच्चन यांनी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूकीदरम्यान दुरचित्रवाणीं वाहिन्यांवर केलेल्या जाहिरातींवर आक्षेप घेणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

### जन्म

- १४९४ - सुलेमान, ऑट्टोमन सम्राट.
- १६६१ - कार्लोस दुसरा, स्पेनचा राजा.
- १८४१ - आर्मांड फॅलियेरेस, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.
- १८६० - इग्नास पादेरेव्स्की, पोलंडचा राष्ट्राध्यक्ष.
- १८७६ - अर्नी हेस, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १२३१ - त्सुचिमिकाडो, जपानी सम्राट.
- १४०६ - पोप इनोसंट सातवा.
- १६३२ - गुस्ताफस ॲडोल्फस, स्वीडनचा राजा.
- १६५६ - होआव चौथा, पोर्तुगालचा राजा.
- १७९६ - कॅथेरिन दुसरी, रशियाची साम्राज्ञी.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. २९



**आडवे शब्द**

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

**उभे शब्द**

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दु:ख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक, ४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दु:ख,हळहळ

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. २८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ.पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१.कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

उभे उत्तर : १.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९. मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२.मात्र ७३.कोर ७५.वार

# सापे, वाशेरे, आमणे, सावद रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील सापे, वाशेरे, आमणे आणि सावद मार्गे कल्याणकडे जाणाऱ्या रस्त्यांची काही ठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून वाहनचालकांना दररोज तारेवरची कसरत करावी लागत आहे. अवकाळी पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचा धोका अधिक वाढला आहे. स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, प्रशासनाकडून केवळ खडीची



मलमपट्टी करून तात्पुरती उपाययोजना केली जाते, असा आरोप होत आहे. कल्याण–पडघा मार्गावरील सापे, वाशेरे, आमणे व सावाद परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. आमणे येथे खड्डे पडलेल्या रस्त्याच्या शंभर मीटर अंतरावरच समृद्धी महामार्ग आहे. त्यामुळे महामार्गावर जाणाऱ्या नागरिकांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो. सध्या समृद्धी महामार्गावर प्रवासासाठी वाहनांची संख्या वाढल्याने या दुय्यम रस्त्यावर वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे. परिणामी खड्ड्यांमुळे वाहनांची नासधूस, कमरे–मानेचे आजार आणि प्रवासातील त्रास नागरिकांना भेडसावत आहे. याशिवाय सापे, वाशेरे, आमणे ,सावद व बापगाव परिसरात अनेक औद्योगिक गोदामे असल्याने दिवसरात्र ट्रक, कंटेनर व जड वाहनांची सतत वर्दळ असते. खड्ड्यांमुळे ही वाहने वारंवार बंद पडतात आणि वाहतूक कोंडीचे चित्र नेहमी दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा–कॉलेजला जाताना, तसेच रुग्णांना दवाखान्यात नेण्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे."फक्त मलमपट्टी नव्हे ,तर खड्डे कायमस्वरूपी कधी बुजवले जाणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे.

> "काही दिवसांपूर्वीच खड्डे भरले होते. मात्र अवकाळी पावसामुळे पुन्हा खड्डे पडले असून, लवकरच दुरुस्तीचे काम करण्यात येईल."
>
> **-दत्तु गीते, भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता )**



वैजापुर : लोणी खुर्द (ता. वैजापूर) येथे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठाणच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. शौर्य प्रतिष्ठाणचे प्रमुख अध्यक्षतेखाली किशोर पाटील मगर यांच्या अध्यक्षतेखाली लोणी खुर्द येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले यावेळी विनायकराव सहकारी साखर कारखाना चालु करावा. ,शिऊर चंगला ते तलवाडा घाट पर्यंत रसत्यावरील खड्डे तत्काळ भरण्यात यावे , ओला दुष्काळ जाहीर करून शेतकरी कर्जमाफी करा, अतिवृष्टी भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ जमा करावी , वैजापूर रोटेगाव एम. आय.डी.सी. चालु करावी, मागील वर्षांचा व चालु वर्षाचा पिक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा.

## थोडक्यात बातम्या...



### जुन्नर तालुका बिबट मुक्त करण्यासाठी मंत्रालयावर मोर्चा

**शिवनेरी (स. गांवकरी) :** वनविभाग कार्यालय व उपविभागीय कार्यालय समोर तालुक्यातील सरपंच व ग्रामपंचायत सर्व सदस्य संघटना यांनी बिबट मुक्त जुन्नर तालुका झालाच पाहिजे . याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यास जुन्नर तालुक्यातील मंत्रालय मोर्चा काढणार असे ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक किरण अवचर व प्रदीप चव्हाण व संबंधित अधिकारी कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते .या ठिय्या आंदोलन प्रसंगी सांगितले की , बिबट हद्दपार करा किंवा बंदिस्तकरा यासाठी महाराष्ट्र शासनाला पंधरा दिवसाचा कालावधी दिला आहे . छत्रपती शिवाजी महाराज कि जय , जुन्नर आमचं हक्काच नाही कुणाच्या बापच , बिबट्या हाटाव -- जुन्नर बचाव , बिबट सफारी बारामती ला जाऊ द्या अशा घोषणा यावेळी दिल्या .जुन्नर तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ घातला आहे. यामुळे शेतकरी , मंजुर , मेंढपाळ, नागरिक व विद्यार्थी यांचे जनजीवन विस्कळित झाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ जुन्नर लाईट बाबत दुर्लक्ष सातत्याने करीत आहे. बिबट वर्ग १ मधुन वगळण्यात यावा.परदेशात बिबट स्थालांतरित करण्यात यावा . केंद्र सरकारने नसबंदी व शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय लवकर घ्यावा. या ठिय्या आंदोलन कडे दुर्लक्ष केल्यास पुढील आंदोलन छेडणार आहे.बिबट सफारी ला पाठिंबा नाही, पण ठार मारण्याची परवानगी द्यावी. पकडलेले बिबट्या ला बिल्ला किंवा कॉलर आयडी बसवा. असे जुन्नर तालुक्यातील सरपंच संतोष जाधव , हरिचंद्र ढोले , सविता ठोसर , अनिता जाधव , चंद्रशेखर चिलम , उत्तम खर्गे , वैशाली थोरवे , खंडू काशीद , नवनाथ नर्हे , गोविंद साबळे , कुलदीप नाईकवाडी, सखाराम नाईकवाडी , वैभव नलवडे , सुभाष कामटकर , प्रदीप थोरवे , अविनाश ढोबळे , जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे , समाजसेविका संध्या भगत इतर सरपंच, उपसरपंच , ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी यांनी याप्रसंगी भावना व्यक्त केल्या.

### कै. गंगाधर तुकाराम हांडे यांचे हृदय विकाराच्या धक्क्याने दुःखद निधन



**डोंगरगाव (स. गांवकरी) :** डोंगरगाव येथील कै.गंगाधर तुकाराम हांडे यांचे (वय 75) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,सहा मुली,भाऊ, सुना,नातू ,पतवंडे,जावई असा मोठा परिवार आहे. अमोल गंगाधर हांडे यांचे ते वडील होत. डोंगरगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



### जनसेवक नानासाहेब कोथिंबिरे यांचा वाढदिवस उपक्रमांनी साजरा

- **श्रीगोंद्यात रक्तदान, सन्मान सोहळा आणि सामाजिक एकतेचा संदेश**

**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन कार्य करण्याची ओळख असलेले जनसेवक नानासाहेब कोथिंबिरे यांनी आपला वाढदिवस यंदा देखील सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला. श्रीगोंदा शहरात विविध उपक्रमांनी भरलेला हा दिवस समाजभावनेचा आणि सेवाभावाचा उत्कृष्ट नमुना ठरला. थॅलेसिमिया ग्रस्त बालरुग्णांसाठी आयोजित रक्तदान शिबिराने कार्यक्रमाची सांगता झाली. शनी-मारुती मंदिर परिसरात झालेल्या या शिबिरात युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व तब्बल ४४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. समाजहिताचा हा अभिनव उपक्रम नागरिकांच्या सहभागाने अधिक प्रभावी ठरला. सकाळी शहरातील प्रमुख मंदिरांमध्ये कोथिंबिरे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. सायंकाळी राम मंदिर येथे आयोजित स्वच्छता कर्मचारी सन्मान सोहळ्यात नगरपरिषदेतील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. समाजाच्या प्रत्येक स्तराशी जोडलेले राहण्याचा कोथिंबिरे यांचा प्रयत्न या सन्मान कार्यक्रमातून अधोरेखित झाला. यावेळी आमदार विक्रम पाचपुते, बापूशेठ गोरे, कांतीलाल कोथिंबिरे, पोपट खेतमाळीस, संदीप नागवडे, धनराज कोथिंबिरे, अदिकशेठ वांगणे, नंदकुमार ताडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांनी नानासाहेब कोथिंबिरे यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक करत, "सामान्य जनतेसोबत वाढदिवस साजरा करणं म्हणजे खरं जनसेवकत्व," असे गौरवोद्गार काढले. दरम्यान, शहरातील चौकाचौकांत "हक्काचा माणूस — नानासाहेब कोथिंबिरे" असे बॅनर झळकले, तर व्यावसायिक व नागरिकांनी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. श्रीगोंद्यात नानासाहेब कोथिंबिरे यांचा वाढदिवस हा केवळ एक उत्सव नव्हे, तर समाजसेवेचा संदेश देणारा प्रेरणादायी सोहळा ठरला.

# दिंडोरी अतिवृष्टीचा तडाखा – बळीराजाच्या पाठीशी सरकार ठाम!

## मंत्री गिरीश महाजन आणि डॉ. भारती ताई पवार यांची दिंडोरीत नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

**कळवण (नाशिक) : (समर्थ गांवकरी)**

दिंडोरी तालुक्यातील जानोरी व कोरटे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आज पुन्हा एकदा दु:खाचे सावट दाटले आहे. अवकाळी पावसाच्या संतापाने द्राक्षबागा उद्ध्वस्त झाल्या, सोयाबीन, मका, कांदा आणि नगदी पिकांचेही थैमान उडाले. शेतकऱ्यांचे श्रमाचे सोनं पाण्यात वाहून गेलं — बळीराजाच्या डोळ्यांत आज अश्रू आणि मनात काळजी आहे.याच पार्श्वभूमीवर आज मा. पालकमंत्री गिरीश महाजन आणि ,माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती ताई पवार यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या वेदना



जाणून घेतल्या. पावसाने उद्ध्वस्त झालेल्या द्राक्षबागा आणि शेतांमध्ये उभे राहून त्यांनी नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेतला शेतकऱ्यांशी संवाद साधताना मंत्री महाजन म्हणाले "हे संकट केवळ निसर्गाचं नाही, तर आपल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या जीवनाशी जोडलेलं आहे. सरकार बळीराजाच्या पाठीशी ठाम उभं आहे. कोणालाही एकटं सोडलं जाणार नाही."

त्यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश देत, "नियमांच्या चौकटीत अडकून बसू नका – शक्य तेवढी मदत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा," असा स्पष्ट आदेश दिला.या पाहणीवेळी जिल्हाधिकारी श्री. आयुष प्रसाद, तहसीलदार श्री. मुकेश कांबळे, तालुका कृषी अधिकारी श्री. नानाजी भोये यांच्यासह स्थानिक अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. गावागावात पिकांच्या ओळींमध्ये सुकलेली आशा आणि ओलसर मातीतून डोकावणारा शेतकऱ्याचा हतबल चेहरा — या दृश्याने

> पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती ताई पवार यांनी सांगितले की "माझा शेतकरी उध्वस्त झाला आहे. त्याने घाम गाळून उभं केलेलं पीक अतिवृष्टीने वाहून गेलं आहे. त्या प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळावा आणि नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी, यासाठी मी स्वतः सतत पाठपुरावा करत आहे."

उपस्थित सर्वांनाच विचारात पाडलं. शेतकरी आज हताश नाही, पण अपेक्षेने सरकारकडे पाहत आहे.

आजची ही पाहणी म्हणजे केवळ औपचारिकता नव्हे, तर शासनाने घेतलेली संवेदनशील भूमिका.

मात्र या शब्दांना कृतीची जोड मिळाली, तरच या मातीतील शेतकऱ्याच्या हृदयात पुन्हा आशेचे बीज रुजेल!

# पै. साई अशोक म्हस्के यांचा जुदो कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील बालेवाडी स्टेडियम येथे नुकत्याच पार पडलेल्या १४ वर्षाखालील शालेय जुदो कुस्ती स्पर्धेत पै. साई अशोक म्हस्के रा चांडगाव, ता. श्रीगोंदा यांनी चमकदार कामगिरी करत विभागीय प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, संपूर्ण चांडगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. साई अशोक म्हस्के हा आत्मा मलिक कुस्ती केंद्र, कोकमठाण येथील प्रतिभावान खेळाडू असून, त्याला मार्गदर्शन NIS कुस्ती कोच पै. विवेक नाईकल यांचे लाभले आहे. त्यांच्या कुशल प्रशिक्षणाखाली साईने अल्पावधीतच उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या गावाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.



# बजाज फायनान्सने सणासुदीच्या कर्जांमध्ये २७% वाढ नोंदविली

**मुंबई/पुणे : (समर्थ गांवकरी)**

- **आर्थिक समावेशकतेला गती दिली; बजाज फायनॅन्सकडे पहिल्यांदा आलेले 52% ग्राहक पहिल्यांदाच कर्ज घेणारे कर्जदार आहेत**

भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने आज सांगितले की, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात 27% आणि मूल्यात 29% जास्त होती.ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जांमधील या वाढीतून सरकारच्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. उपभोक्त्याची खरेदी करण्याची क्षमता वाढविणे हेच या सुधारणांचे लक्ष्य होते. 22 सप्टेंबर ते 26 ऑक्टोबर 2025 या कालावधीत बजाज फायनॅन्सने अंदाजे 63 लाख कर्जे वितरित केली. या कालावधीत कंपनीने 23 लाख नवीन ग्राहक मिळवले, त्यापैकी 52% ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. अशाप्रकारे आर्थिक समावेशकतेत कंपनीने लक्षणीय प्रगती केली आहे. बजाज फायनान्सचे अध्यक्ष संजीव बजाज म्हणाले, "सरकारने केलेल्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांमुळे भारताच्या उपभोग-केंद्रित विकास गाथेला एक नवीन रेटा मिळाला आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू अधिक किफायतशीर बनवून सदर उपाययोजनांनी मध्यम आणि कमी उत्पन्न असलेल्या कोट्यावधी कुटुंबांना सणासुदीच्या मोसमात आत्मविश्वासाने खरेदी करण्याचे बळ दिले. हा सकारात्मक प्रभाव केवळ उपभोक्ता कर्ज वितरणात झालेल्या 27% वाढीतून दिसत नाही, तर अधिक चांगल्या जीवनशैलीसाठी उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांकडे वळण्याच्या ग्राहकांच्या वृत्तीमधून देखील दिसतो." ते पुढे म्हणाले, "या सणासुदीच्या मोसमात आमच्याकडे आलेल्या नवीन ग्राहकांपैकी अर्ध्याहून जास्त ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. आपले पहिले कर्ज या औपचारिक आर्थिक प्राणलीमधून घेण्याचे त्यांनी पसंत केले. बजाज फायनान्सचे डिजिटल प्लॅटफॉर्म आणि देशभरातील 4200 ठिकाणी असलेल्या 239,000 सक्रिय वितरण केंद्रांच्या उपस्थिती सह आम्ही आर्थिक समावेशकता अधिकाधिक रुजवण्याचा आणि भारतीय उपभोक्त्याच्या उत्थानाला बळ देण्याचा प्रयत्न करत आहोत."

# आपला दवाखाना कंत्राट संपल्याने बंद तर कर्मचाऱ्यांचे वेतन ही रखडले

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिकेचा 'आपला दवाखाना' उपक्रम कंत्राट संपल्यामुळे बंद करण्यात आला असून त्याऐवजी केंद्र शासनाच्या योजनेतून ४३ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरे सुरू करण्यात आली आहेत. याशिवाय राज्य शासनाच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेत १२ दवाखाने सुरू करण्यात आली आहेत. यापैकी तीन आरोग्य मंदिरांना भाजपचे आमदार संजय केळकर यांनी अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता ती बंद असल्याचे आढळून आले




होते. यावरून त्यांनी संताप व्यक्त केला होता. त्यामुळे ठाणे पालिका प्रशासनावर टिका झाली होती. 'आपला दवाखाना' या आरोग्य उपक्रमातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. काही महिन्यांपासून थकलेल्या वेतनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेले तसेच बेरोजगार झालेल्या या कर्मचाऱ्यांना नव्याने सुरू होत असलेल्या 'आयुष्मान आरोग्य मंदिर' या उपक्रमात सामावून घेण्याची मागणी केळकर यांनी केली आहे. ठाणेकरांना घराजवळच मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी ठाणे महापालिकेने आपला दवाखाना उपक्रम सुरू केला होता. या उपक्रमाचे कंत्राट संपल्याच्या काही महिने आधीच ठेकेदाराने काम बंद केले. तसेच याठिकाणी कार्यरत असलेले डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे वेतन दिले नव्हते. मुद्दा आमदार केळकर यांनी उपस्थित करत आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन ठेकेदाराचा काळ्या यादीत समावेश केला असून डॉक्टरांसह कर्मचाऱ्यांना थकीत पगार दोन दिवसांत दिला जाणार असल्याचे आश्वसन आयुक्तांनी केळकर यांना दिले होते.

# नागरिकांनी रक्तदान करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

असे म्हणतात की एका व्यक्तीने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" असे मानले जाते. ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासत असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे. इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे.

# जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकल्याचा सार्थ अभिमान : रमेश खरमाळे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

मंगळवार दि:-४ नोव्हेंबर रोजी सामाजिक वनीकरण जुन्नर व पंचायत समिती जुन्नर मार्फत खालील १० शाळेंवर पर्यावरणाचे मानवी जीवनात महत्व व बिबट्या पासून स्वसंरक्षण कसे घ्यावे याबाबत शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सकाळी ९:३० वाजल्यापासून संध्याकाळी ५:३० पर्यंत केलेली धावपळ एकच होती की जेवढं शक्य होईल तेवढ्या शाळेमध्ये पोहचुन मुलांना बिबट्या पासून संरक्षण कसे घ्यावे याची माहिती पोहचविणे व होणारे अपघात थांबावेत.गोद्रे,भुंडेवाडी शाळेतील मुलांना मार्गदर्शन करुन जेव्हा पिंपळगाव सिध्दनाथ येथील पानसरे वाडीतील जिल्हा




परिषद प्राथमिक शाळा पानसरे वाडीत पोहचलो तेव्हा मात्र मला जिल्हा परिषदेचे फक्त कौतुकच नाही वाटले तर जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकल्याचा खरोखरच अभिमान वाटला.

प्रथमतः तर चकीतच झालो. तेथील असलेल्या शिक्षिका यांना मुलांना पर्यावरण व बिबट संरक्षण याबाबत माहिती द्यायची आहे असे म्हटले तर त्या द्या की म्हणाल्या.त्यांच्या उत्तराने चक्रावून गेलो.कारण त्यांच्या समोर फक्त एकच मुलगा बसलेला होता.मला वाटले की कदाचित बाकी मुले बाहेर असावीत परंतु तो माझा फक्त भ्रम होता. त्यांना विचारले बाकी मुले कुठं आहेत? त्या उत्तरल्या या शाळेत फक्त एकच मुलगा आहे. ही एक शिक्षकी शाळा आहे.आश्चर्याने थोडावेळ त्यांच्याकडेच पाहत बसलो व मला जिल्हा परिषदेचा अभिमान वाटला याच कारण होतं मराठी शाळा टिकून रहावी मराठी भाषा टिकुन रहावी यासाठी एक मुलगा असला म्हणून काय झाले? मराठी शाळा ही चालूच राहणार हा ध्यास जिल्हा परीषदेचा थोडक्यात अस्मितेचा नक्कीच असेल व यांचा मला अभिमान वाटला.त्या एका मुलाला बिबट्या संरक्षण व पर्यावरणा विषयी माहिती दिली व त्या शाळेतुन बाहेर पडुन सॅल्युट ठोकायला मात्र विसरलो नाही.असे जुन्नर वनरक्षक रमेश खरमाळे यांनी सांगितले

१) ज्ञानदा माध्यमिक विद्यालय गोद्रे २) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोद्रे,३)भुंडेवाडी ४) पानसरे वाडी,५) विठ्ठलवाडी,६) हनुमानवाडी,७)जिल्हा अलदरे ८) ठाकरवाडी अलदरे,९) ठाकरवाडी (गोळेगाव),१०) गोळेगाव या शाळेत बिबट्या पासून संरक्षण करण्यासाठी उपाययोजना व पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे आवश्यक ह्या संदर्भात माहिती व मार्गदर्शन करण्यास माजी सैनिक,वनरक्षक रमेश खरमाळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोद्रे येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले,तेव्हा ग्रा. पं.उपसरपंच दिलीप गायकवाड, पो.पाटील सागर हिले,पेसा अध्यक्ष मारुती मांडवे,ग्राम पंचायत अधिकारी रामदास जोशी व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# तुळशीविवाह हे निसर्ग आणि परमात्म्याच्या मिलनाचे प्रतीक आहे

## नानजीभाई ठक्कर!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

कार्तिक महिन्यातील शुक्ल एकादशीच्या पवित्र दिवशी जय भगवान सभा गृह, हरी निवास ठाणे येथे तुळशी विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या मंगल सोहळ्याच्या विशेष प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित होते. कार्यक्रमात रंजनबेन कांतीलाल, कालीबेन शांतीलाल, कल्पनाबेन महादेवभाई, तरुणाबेन प्रवीणभाई, गीताबेन राजूभाई ठक्कर यांच्यासह गायत्री मंडळ आणि महिला मंडळाच्या सर्व बहिणींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नानजीभाई ठक्कर यांनी गायत्री महिला मंडळाच्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. ते म्हणाले, "गायत्री महिला मंडळाच्या बहिणींनी निष्ठेने, उत्साहाने आणि सेवाभावाने या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले आहे. त्यांचा उत्साह आणि सहकार्य खरोखरच प्रशंसनीय आहे." ते पुढे म्हणाले, "तुळस ही केवळ एक वनस्पती नाही, तर ती आपल्या घरातील पवित्रतेचे, आरोग्याचे आणि सकारात्मक उर्जेचे प्रतीक आहे. जिथे तुळशी असते तिथे देव राहतो असे मानले जाते. तुळशीविवाह हे निसर्ग आणि दैवी यांच्यातील एकतेचे प्रतीक आहे. हा सोहळा आपल्याला प्रेम, समर्पण आणि संवादाचे महत्व समजावून देतो." नानजीभाई ठक्कर यांनी पुढे सांगितले की अशा धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे आपली परंपरा जिवंत राहते आणि नवीन पिढीला भारतीय संस्कृतीचे सौंदर्य अनुभवता येते. कार्यक्रमाच्या शेवटी गायत्री महिला मंडळाच्या बहिणींनी नानजीभाई ठक्कर यांच्या उपस्थितीबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि त्यांचा सन्मान करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



ठाणे : श्रमजीवी संघटनेच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी मुख्यालयासमोर आदिवासी बचाव, कातकरी बचाव आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आत्मक्लेषातून निर्धाराच्या प्रकाशाकडे नेण्याचा संकल्प करण्यासाठी दिवे प्रज्वलित करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### आ भीमराव केराम यांचा डॉ. राठोड व ॲड. सुनील येरेकर यांच्या हस्ते सत्कार

किनवट (स. गांवकरी) : माहेर हॉस्पिटल, किनवट चे संचालक डॉ. अनिल राठोड यांच्या रुग्णालयात अलीकडेच एक आनंददायी प्रसंग घडला. किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ भीमराव केराम यांच्या ज्येष्ठ चिरंजीव क्रांती शरण केराम यांना पुत्ररत्न प्राप्त झाले असून, या जन्मामुळे माहेर हॉस्पिटलमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज दिनांक ५ नोव्हेंबर २०२५, गुरुनानक जयंती व कार्तिक पौर्णिमेच्या शुभदिनी आ केराम यांनी आपल्या नातवाला भेटण्यासाठी माहेर हॉस्पिटलला भेट दिली. यावेळी त्यांनी डॉ. अनिल राठोड आणि डॉ. प्रियंका राठोड यांची भेट घेऊन आई व बालकाच्या प्रकृतीची विचारपूस केली तसेच हॉस्पिटलमधील अत्याधुनिक आरोग्यसेवा आणि स्वच्छतेबद्दल समाधान व्यक्त केले. या प्रसंगी माहेर हॉस्पिटल चे संचालक डॉ. अनिल राठोड आणि ॲडव्होकेट सुनील येरेकर यांनी आमदार केराम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. कार्यक्रमाला सेवानिवृत्त पी.एस.आय. जाधव साहेब तसेच पवार मेडिकलचे संचालक गोपाल पवार यांची उपस्थिती लाभली. माहेर हॉस्पिटलमध्ये आमदार केराम यांच्या नातवाचा जन्म झाल्याने रुग्णालयात व स्थानिक समाजातही आनंदाचे वातावरण असून, केराम परिवाराला सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### शिवारात गोदावरी नदीपात्रातुन वाळू उपसा करनाऱ्या बोटी उद्ध्वस्त



नायगाव (स. गांवकरी) : नायगाव व उमरी महसूल ची संयुक्त कार्यवाही दरम्यान दोन बोटी उद्ध्वस्त करण्यात आल्या. यासाठी कार्यवाही दरम्यान उमरी येथिल तहसीलदार मंजुषा भगत तसेच धर्माबाद उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे नायगाव तहसीलदार डॉक्टर धम्मप्रिया गायकवाड तसेच बिलोली उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे आणि महसूल कर्मचारी व पोलीस कर्मच्यारी यांच्या उपस्थितीत अवैध रित्या वाळू उपसा बोटी उद्धवस्त करून करण्यात आले.

### प्रती हेक्टरी दहा हजार रुपयाची मदत करून शब्द पाळला : बालाजी बच्चेवार



नायगाव (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने नुकताच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जून ते सप्टेंबर २०२५या कालावधीत अवकाळी पाऊस आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून रब्बी हंगामासाठी विशेष मदत देण्यात येणार आहे. या मदतीअंतर्गत, शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ₹ १०'०००/- इतकी मदत करण्यात येणार असून ही मदत ३ हेक्टरपर्यंत मर्यादित राहणार आहे. या योजनेअंतर्गत, एकूण ₹ ३४८, ८४, ११, ००, ०००/- (तीनशे अठ्ठेचाळीस अब्ज आठशे चौऱ्याऐंशी कोटी अकरा लाख) इतक्या रकमेची मंजूरी देण्यात आली आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांना त्यांचे शेतीचे नुकसान भरून काढण्यासाठी आणि रब्बी हंगामासाठी तयारी करण्यासाठी मदत होणार आहे. देवेंद्र फडवणीस यांच्या सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होणार आहे त्याचा लाभ घेता यावा यासाठी सर्व संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी.

### मा. श्री. उकिर्डे सर यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार!

संगमनेर (स. गांवकरी) : जय भवानी माता विद्यालय, केळुंगण चे संस्थापक व मुख्याध्यापक मा. श्री. उकिर्डे सर यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई तसेच भारत सरकार संलग्न, महाराष्ट्र राज्याची सेवाभावी संस्था जनकल्याण सामाजिक सेवा संस्था, कोल्हापूर यांच्या वतीने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. तसेच सध्या नूतन माध्यमिक विद्यालय, पांजरे येथे कार्यरत असलेले संस्थेचे जेष्ठ शिक्षक मा. श्री. सोमनाथ हासे सर यांना देखील त्याच संस्थेचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या दोन्ही मान्यवर शिक्षकांचा आदर्श महिला शिक्षण विकास संस्था, मालदाड रोड, संगमनेर चे संस्थापक सचिव मा. श्री. राघु सावळेराम जाधव (दादा) यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी उकिर्डे सर व हासे सर यांचे मन:पूर्वक अभिनंदन करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

# शेतकऱ्यांची फसवणूक : श्रीरामपूर पोलिसांची मोठी कारवाई, ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त!




**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांची फसवणूक करून ट्रॅक्टर पळवणाऱ्या टोळीवर श्रीरामपूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल ९ ट्रॅक्टर आणि २ मोटारसायकल असा एकूण ७१ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाघचौरे (श्रीरामपूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. फिर्यादीस आरोपी भालचंद्र अशोक साळवी (रा. वनकुटे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि त्याचा साथीदार अभिजीत सुनिल भांडवलकर (रा. सिव्हिल हाडको, अहिल्यानगर) यांनी "ट्रॅक्टर घेऊन देतो, डाऊन पेमेंट आम्ही भरतो" असा विश्वास संपादन करून फसवणूक केली.

त्यांनी फिर्यादीकडून आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक, शेतीचे उतारे अशी कागदपत्रे घेतली. एल अँड टी फायनान्स कंपनीमार्फत लोन काढून ट्रॅक्टर त्यांच्या नावावर घेऊन दिल्यानंतर तो ट्रॅक्टर स्वतःकडे नेला आणि ठरल्याप्रमाणे पैसे दिले नाहीत. फिर्यादीने याबाबत दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी राजूर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ४०१/२०२५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१ अंतर्गत गुन्हा नोंदवला होता. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींवर पाळत ठेवली असता ते अहिल्यानगर जिल्ह्यात आल्याचे समजले. त्यानुसार पथकाने तातडीने कारवाई करून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

चौकशीत त्यांनी ट्रॅक्टर सिल्लोड येथील करण राजपूत यास ४ लाख रुपयांना विकल्याची कबुली दिली. तसेच अशाच प्रकारे इतर अनेक शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचेही उघड झाले. या संपूर्ण कारवाईत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय अधिकारी कुणाल सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. कारवाईत स.पो. नि. दिपक सरोदे (राजूर पोलीस स्टेशन) व त्यांच्या सहकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

> श्रीरामपूर, श्रीगोंदा, नारायणगाव आणि सिन्नर येथे पाठविलेल्या पथकांनी या सर्व वाहनांचा शोध लावला. पुढील तपास सुरू असून टोळीतील इतर साथीदारांची माहिती घेण्यात येत आहे.
>
> **— पोलीस विभाग, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

# जुन्नर तालुका बिबट मुक्त करण्यासाठी मंत्रालयावर मोर्चा

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

वनविभाग कार्यालय व उपविभागीय कार्यालय समोर तालुक्यातील सरपंच व ग्रामपंचायत सर्व सदस्य संघटना यांनी बिबट मुक्त जुन्नर तालुका झालाच पाहिजे . याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यास जुन्नर तालुक्यातील मंत्रालय मोर्चा काढणार असे ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक किरण अवचर व प्रदीप चव्हाण व संबंधित अधिकारी कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते . या ठिय्या आंदोलन प्रसंगी सांगितले की , बिबट हद्दपार करा किंवा बंदिस्तकरा यासाठी महाराष्ट्र शासनाला पंधरा दिवसाचा कालावधी दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज कि जय , जुन्नर आमचं हक्काच नाही कुणाच्या बापच , बिबट्या हाटाव -जुन्नर बचाव , बिबट सफारी बारामती ला जाऊ द्या अशा घोषणा यावेळी दिल्या .

जुन्नर तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ घातला आहे. यामुळे शेतकरी , मंजुर , मेंढपाळ, नागरिक व विद्यार्थी यांचे जनजीवन विस्कळित झाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ जुन्नर लाईट बाबत दुर्लक्ष सातत्याने करीत आहे.

# राहुल नाईक व ज्योत्सना नाईक यांची उमेदवारीची मागणी

- **राष्ट्रवादी शरद पवार पक्षात चुरस वाढली**



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची लगबग सुरु झाली असून, सर्वच राजकीय पक्षांनी इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवण्यास प्रारंभ केला आहे. काही पक्षांची अर्जप्रक्रियाही पूर्णत्वास गेली आहे. याच पार्श्वभूमीवर माजी आमदार स्व. प्रदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली सलग १५ वर्षे सत्तेत राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यांच्या इच्छुक उमेदवारांचे अर्ज दहेली तांडा येथे नाईक यांच्या निवासस्थानी संकलित करण्यात आले. या वेळी गोकुंदा जिल्हा परिषद गटातून कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक यांनी खुल्या प्रवर्गातील जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर मांडवी जिल्हा परिषद गटातील ओबीसी महिला आरक्षित जागेसाठी राहुल नाईक यांच्या सौभाग्यवती ज्योत्सना राहुल नाईक यांच्या उमेदवारीसाठी अर्ज सादर करण्यात आला. राहुल नाईक यांचे कुटुंब हे स्व. प्रदीप नाईक यांचे निष्ठावान सहकारी असून त्यांच्या कुटुंबाचा परिसरात चांगला प्रभाव आहे. त्यामुळे नाईक दांपत्याने दोन जिल्हा परिषद गटातून उमेदवारी मागितल्याने राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या गोटात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या कार्यक्रमावेळी उमेदवारांचे अर्ज राष्ट्रवादी नेत्या श्रीमती बेबीताई नाईक तसेच युवा नेते कपिल नाईक यांनी स्वीकृत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, माजी नगराध्यक्ष साजिद खान, माहुर नगराध्यक्ष फेरोज दोसाणी, माजी सभापती अनिल पाटील, गटनेते झहिरोद्दीन खान आणि माजी नगरसेवक प्रविण राठोड यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमानंतर तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या पुढील रणनितीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डिपी बंद : महावितरण विभागाचा भोंगळ कारभार




**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नायगाव तालुक्यातील गडगा येथील कृषी पंपाचा विधुत पुरवठा मागील सात महिन्यापासून बंद असून. शेतकऱ्यांच्या विहिरीतील मोटारी बंद आहेत.पिण्याचा पाण्याचा व शेतीसाठीच्या सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांना देखील पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.या अतिशय गंभीर विषया कडे जिल्ह्याधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

येथील डिपी गेल्या सात महिन्यापासून बंद अवस्थेत असून. महावितरणाचे जबाबदार अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असून. शेतकऱ्यांनी रब्बी पिके घेण्यासाठी शेतीची मशागत करून ठेवली.मात्र संबधिताकडून विजेचा ट्रान्सफॉर्मर दुरुस्त किंवा नविन बसून दिला जात नाही.यासंदर्भात शेतकऱ्यांनी अनेक वेळा तक्रारी केल्या. मात्र महावितरणाच्या अधिकाऱ्यांकडून फक्त आश्वासन दिले जाते.आमच्या हातात काही नाही.रिपोर्ट् पाठवला आहे.देगलूर येथून डिपी आल्याच्या नंतर बसून देवू असे उडव उडवीचे उत्तरे मागील सात महिन्यापासून देत आहेत.या बाबींकडे महावितरणाचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून सदरिल समस्या सोडवावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत आहे लाईट आभावी जनावरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.शेतकरी व पशुधनासाठी मोठं संकट आहे.महावितरणाचे अधिकारी लक्ष देत नाहीत या कडे जिल्हाधिकारी यांनी व्यक्तीक लक्ष देऊन परिसरातील शेतकऱ्यांना न्याय मिळून द्यावे अशी मागणी शेतकरी वर्गातुन केली जात आहे.

# आळेफाटा येथील रस्ते खड्डेमय



**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**

गेल्या दोन –तीन महिन्यांपासून कल्याण अहिल्यानगर मार्गावरील आळेफाटा रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्पुरती मुरूम टाकून डागडुजी केली आहे ,मात्र सतत पडणाऱ्या पावसाचे पाणी या खड्डयांत साचत आहेत .त्यामुळे या रस्त्यावरून ये –जा करणाऱ्या वाहनचालकांना तसेच पायी चालणाऱ्या लोकांनाही मोठी कसरत करावी लागते ,तर काही ठिकाणी अपघातही घडले आहेत . कल्याण –अहिल्यानगर महामार्गावरील हा मार्ग महत्वाचा असून दररोज या रस्त्यावरून हजारो नागरिक ,एसटी बस ,मालवाहतूक गाड्या प्रवास करत असतात .स्थानिक प्रवासी तसेच ये –जा करणारे प्रवासी या रस्त्याच्या दुरवस्थेकडे पाहून म्हणत आहेत की, 'शासन झोपले आहे का ?' असा सवाल करत आहेत .

# वारकरी दांपत्याचा आमदार बाबुराव कदम यांच्या हस्ते भव्य सत्कार



**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

यावर्षीच्या कार्तिकी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे व त्यांच्या परिवारासह श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या महापूजेचा मान मिळवणारे पोटा (बु.) येथील मानाचे वारकरी दांपत्य रामराव बसाजी वालेगावकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांचा भव्य सत्कार सोहळा गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. या प्रसंगी बोलताना आमदार बाबुराव कदम कोहळीकर म्हणाले की, "पोटा (बु.) गावासह संपूर्ण तालुका व विधानसभा क्षेत्राचे हे मोठे भाग्य आहे की आपल्या गावातील वारकरी दांपत्याला यंदा विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान मिळाला आहे. त्यांची सेवा, श्रद्धा आणि विठ्ठलभक्ती अपार आहे. गेली वीस वर्षे हे दांपत्य नियमित पंढरपूरची वारी करत आहे. पती-पत्नी दोघेही वारकरी असून 'वारी व एकादशी' हेच त्यांचे जीवन झाले आहे. असे महान वारकरी आपल्या मतदारसंघात आहेत, हे सर्वांचे भाग्य आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. पुढे बोलताना आमदार कदम म्हणाले, "पोटा बुद्रुक व पंचक्रोशीतील माळावरील श्री महादेव मंदिराला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून निधी मिळवून देण्यात येईल. त्याचबरोबर श्री दत्त मंदिर, बिरसा मुंडा सभागृह, स्मशानभूमी विकास यांसाठीही मी प्रयत्न करणार आहे. धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी मी कधीही निधी कमी पडू देणार नाही. आपल्या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे," असे आश्वासन त्यांनी दिले.

"आरोग्य, शिक्षण आणि दोन्ही तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या माध्यमातून आवश्यक निधी आणण्यास मी समर्थ आहे," असेही त्यांनी उपस्थितांना सांगितले.

या प्रसंगी आमदार कदम यांच्यासमवेत जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, तालुकाप्रमुख रामभाऊ ठाकरे, बालाजी राठोड, विकास पाटील देवसरकर, राजू पाटील, दिगंबर शिरफुले (ढोले बापू), विनय देशमुख, अनवरखान, ज्ञानेश्वर माने, फिरोज कुरेशी, ज्ञानेश्वर पुट्ठेवाड, गजानन हारडफकर, सिद्धेश्वर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कार समारंभाचे आयोजक ज्ञानेश्वर माने पोटेकर, ह.भ.प. मधुकर महाराज पडवळे, ह.भ.प. रामराव महाराज माने (पोटेकर), रामराव जाधव, सूर्यकांत माने, संदीप देशमुख, कैलास माने, कीर्तनकार बालाजी महाराज माने, नागनाथ वच्चेवाड, तसेच नवतरुण मंडळ, महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापूजेचा मान मिळवून पोटा (बु.) गावाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात गाजविणाऱ्या वालेगावकर दांपत्यावर गावकऱ्यांनी पुष्पवृष्टी करत भव्य सत्कार केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# ओतूर सायकल ग्रुपच्यावतीने ओतूर शिर्डी सायकल वारी संपन्न


**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

ओतूर सायकल ग्रुपच्या वतीने नुकतीच ओतूर शिर्डी ओतूर सायकलवारी आयोजित करण्यात आली होती.अशी माहिती ग्रुपचे अध्यक्ष जयसिंग डुंबरे आणि सचिव गणेश डुंबरे यांनी संयुक्तपणे दिली.याबद्दल अधिक माहिती देताना गणेश डुंबरे म्हणाले की,दरवर्षी ओतुर सायकल ग्रुपच्या वतीने ओतूर ते जाळीचा देव, पंढरपूर,शिर्डी,पंजाब,शेगाव अशा सायकल वारी आयोजित केल्या जातात.काल या ग्रुपने ओतुर शिर्डी ओतूर असा दुहेरी २२५ किलोमीटरचा प्रवास सायकलने



पूर्ण केला. या वारीमध्ये ओतूर सह धोलवड नारायणगाव उंब्रज डिंगोरे आदी गावातील सायकलिस्ट यांनी सहभाग घेतला होता.जवळजवळ २७ सदस्य यामध्ये सहभागी झाले होते. ही सायकलवारी पहाटे साडेपाच वाजता निघाली व ओतूर आळेफाटा घारगाव संगमनेर काकडी विमानतळ मार्गे शिर्डी मध्ये दुपारी ०३ वाजता पोहोचली. व दुसऱ्या दिवशी पुन्हा ओतूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.या सायकल वारीला चैतन्य ज्वेलर्सचे संतोष डुंबरे यांनी सर्व सायकल स्वारांना एनर्जी ड्रिंक साठी सौजन्य दिले. तसेच मुक्काम व दर्शन व्यवस्था योगेश वाबळे,जेवण व्यवस्था सुनील पोकळे गौरी शंकर हॉटेलचे मालक यांनी केली.

गांधी कलेक्शनचे बाळासाहेब शेलोत आणि अजित डांगे यांनी ग्रुपचे स्वागत व सत्काराचे नियोजन केले होते. या सायकलवारीचे जागोजागी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शारीरिक तंदुरुस्तीसाठी सायकल चालवा पर्यावरण वाचवा असा संदेश देणारी ही सायकलवारी सर्वांच्या चर्चेचा विषय ठरली. ओतूर सायकल ग्रुपचे याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर द्वारका परिसरातील श्री श्री राधा मदन गोपाल मंदिर (इस्कॉन) येथे दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्तिक मासानिमित्त गेला महिनाभर सुरू असलेल्या दीपदान महोत्सवाची बुधवारी (दि.०५) सांगता झाली. या महिनाभरात इस्कॉन मंदिरात अनेक उत्सव साजरे झाले जसे की शरद पौर्णिमा, दीपावली, गोवर्धन पूजा, गोपाष्टमी, उत्थान एकादशी. हे उत्सव अत्यंत भक्तिभावाने पार पडले. महिनाभर रोज सकाळी व संध्याकाळी 'दामोदराष्टकम' तसेच दीपदानासाठी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## थोडक्यात बातम्या...

### नवीन इमारतीसाठी १ कोटी २७ लाख ९३ हजार रुपयांचा निधी मंजूर



**नारायणगाव (स. गांवकरी) :** ओतूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र .१ या नव्या शैक्षणिक इमारतीचे भूमिपूजन ३ नोव्हेंबर रोजी आमदार शरददादा सोनवणे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडले .या शाळेसाठी १ कोटी २७ लाख ९३ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे .या नव्या इमारतीमुळे विद्यार्थ्यांना नवीन वर्गखोल्या ,आधुनिक सुविधा ,पदपथ ,शौचालय ,हॅन्डवॉश स्टेशन ,संधारण भिंत ,प्रवेशद्वार व व्यासपीठ तसेच विद्यार्थ्यांसाठी बसायची सोय उपलब्ध होणार असून याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे . यावेळी आमदार शरद सोनवणे ,सरपंच छाया शिंदे ,उपसरपंच प्रशांत डुंबरे ,तंटामुक्ती अध्यक्ष अनुराग फापाळे ,माजी सरपंच सचिन घोलप ,माजी जिल्हा परिषद सदस्य भानुदास गाढवे ,सचिन वाळूंज ,अमोल मोरे ,जितेंद्र घुले ,विक्रम अवचट ,प्रवीण ढमाले ,संतोष डुंबरे ,प्रसाद डुंबरे ,संदेश बढे ,राजू साळुंखे ,विठ्ठल शितोळे ,अशोक लांडे ,उमेश डुंबरे ,रोहन ढमाले ,सुदर्शन शिंदे ,मेघराज तांबे ,नीरज सावंत ,जुन्नरचे कनिष्ठ अभियंता स्वप्नील पांचाळ ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन डुंबरे ,अविष्कार डोके व सर्व सदस्य ,मुख्याध्यापक ,शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते . सरपंच छाया तांबे म्हणाल्या, "ओतूर ही शिक्षकांची भूमी आहे .गावाचे शिक्षण क्षेत्रात वेगळे स्थान आहे .मॉडेल स्कूल प्रकल्पामुळे पालक व विद्यार्थ्यांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे .ग्रामपंचायतीतर्फे शाळेच्या विकासासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील आहोत व पुढील पिढीही अशीच राहील",असे मत त्यांनी व्यक्त केले .



### व्हा. चेअरमनपदी किशोर पाटील यांची बिनविरोध निवड

**रावेर (स. गांवकरी) :** रावेर तालुका शेतमाल सहकारी प्रक्रिया संस्थेच्या व्हाईस चेअरमनपदाचा धनजी लढे यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्याने, त्यांच्या रिक्त जागी किशोर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यालयात निवडणूक अधिकारी फकिरा तडवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवडीप्रसंगी संस्थेचे चेअरमन सोपान पाटील, धनजी लढे, जिजाबराब चौधरी,लक्ष्मण मोपारी, दिलीप पाटील, वाय व्ही पाटील,मुरलीधर तायडे, ईश्वर निळे, सौ छायाबाई महाजन,शकुंतला महाजन, तज्ञ संचालक प्रकाश पाटील, चंद्रकांत विचचे उपस्थित होते. तसेच रमेश नामदेव महाजन,कैलास पाठक, यशवंत धनके,विलास सपकाळ यांनी श्री पाटील यांना शुभेच्छा दिल्या. निवडीसाठी सचिव नंदकलाल वाणी यांनी सहकार्य केले.



### देविदास पाटील यांचे उपोषण सुरु

**रावेर (स. गांवकरी) :** रावेर तालुक्यातील बोरखेडा - तामसवाडी शेत शिवारातील शेत रस्ता पानंद योजने अंतर्गत मोकळ करून मिळावा या मागणीसाठी देविदास किसन पाटील यांनी रावेर तहसिल कार्यालया समोर उपोषण सुरू केले आहे . त्यांनी दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की मी देविदास किसन पाटील मौजे बोरखेडा ता रावेर येथिल स्थानिक रहीवाशी असून , बोरखेडा - तामसवाडी शिव रस्ता मोकळा करणे कामी मी आपल्या कार्यालयाकडे दि.२५ ०४ . १६ . व २९ . ११ .१६ . व १२ .९ . १६ व .१८ . १२ .२०१५ . व आजपर्यंत अनेक वेळा आपल्या कडे अर्ज केलेले आहेत . मा. जिल्हाधिकारी जळगाव यांचे केडे सुद्धा लेखी परव्यवहार केलेला आहे. स्थानिक आमदार , व खासदार यांचेकडे देखिल सुदर शिवरस्ता मोकळा होण्या विनंती आर्ज केलेला होता . परंतु यावर कुठलिच कार्यवाही होत नसल्याने , मला लोकशाही मार्गाने उपोषण करावे लागत आहे . त्यांनी निवेदना पुढे म्हटले आहे की शेत शिवार रस्ता मोकळा नसल्याने , मला व माझ्या कुटुंबियांना फार फार त्रास सहन कराव लागत आहे . तसे आजरोजी माझ्या शेतात मका हे पिक मोडून पडलेले असून , काढणी कामी मला रस्ता नसल्याने फार त्रास सहन करावा लागत आहे . सदर रस्ता मोकळा होणे कामी मी दि ०४ . ११ . २० २५ ग्रामपंचयतीचा ठराव जोडला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सुदर निवेदनाच्या प्रति महसुलमंत्री बावनकुळे , आमदार अमोल जावळे , जिल्हाधिकारी जळगाव , उपविगिय अधिकारी फैजपुर , पोस्टे रावेर ,यांना देण्यात आल्या आल्या असल्याचे म्हटले आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सर्व नियुक्त अधिकाऱ्यांनी राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी आदेशांचे तंतोतंत पालन करून नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका २०२५ शांततेत, पारदर्शकतेने व सुव्यवस्थित पार पाडाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणुकीस मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी उपरोक्त आदेश जारी केले असून, या नेमणुका शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार केल्या आहेत.

निवडणुकांचे कामकाज पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. नियुक्त अधिकारी निवडणुकीदरम्यान शासकीय मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करणार आहेत.

जिल्ह्यातील कोपरगाव नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती भारती सागरे (उपजिल्हाधिकारी) असतील. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महेश सावंत (तहसीलदार, कोपरगाव) व सुहास जगताप (मुख्याधिकारी, कोपरगाव नगरपरिषद) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

संगमनेर नगरपरिषदेकरिता अरुण ऊंडे (उपविभागीय अधिकारी, संगमनेर) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून धीरज मांजरे (तहसीलदार, संगमनेर) व श्रीमती धनश्री पवार (मुख्याधिकारी, अकोले नगरपंचायत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीरामपूर नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत पाटील (उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर) असतील, तर सहायक अधिकारी म्हणून मिलींदकुमार वाघ (तहसीलदार, श्रीरामपूर) व मच्छिंद्र घोलप (मुख्याधिकारी, श्रीरामपूर नगरपरिषद) कार्यभार सांभाळतील.

जामखेड नगरपरिषदेकरिता नितिन पाटील (उपविभागीय अधिकारी, कर्जत-जामखेड) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून अजय साळवे (मुख्याधिकारी, जामखेड नगरपरिषद) व मच्छिंद्र पाडळे (नायब तहसीलदार, जामखेड) यांची नेमणूक करण्यात आली आहे. शेवगाव नगरपरिषदेकरिता प्रसाद मते (उपविभागीय अधिकारी, पाथर्डी-शेवगाव) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून आकाश दहाडदे (तहसीलदार, शेवगाव) व श्रीमती विजया घाडगे (मुख्याधिकारी, शेवगाव नगरपरिषद) यांची नियुक्ती झाली आहे. याशिवाय, पाथर्डी नगरपरिषदेकरिता सुभाष दळवी (उपजिल्हाधिकारी) यांची निवड झाली असून सहायक अधिकारी म्हणून उध्दव नाईक (तहसीलदार पाथर्डी) व दिग्विजय पाटील (नायब तहसीलदार, पाथर्डी) कार्यभार पाहतील.

राहाता नगरपरिषदेकरिता श्रीमती मनिषा राशीनकर (उपजिल्हाधिकारी) यांच्यासह सहायक अधिकारी अमोल मोरे (तहसीलदार, राहाता) व वैभव लोंढे (मुख्याधिकारी, राहाता नगरपरिषद) असतील. राहुरी नगरपरिषदेकरिता अनुपसिंह यादव (उपजिल्हाधिकारी) निवडणूक निर्णय अधिकारी असतील, तर सहायक अधिकारी नामदेव पाटील (तहसीलदार, राहुरी) व सोपान बाचकर (नायब तहसीलदार,राहुरी) नेमले गेले आहेत.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेकरिता श्रीमती गौरी सावंत (उपजिल्हाधिकारी) यांची निवड झाली असून सहायक अधिकारी म्हणून ऋषिकेश पाटील (मुख्याधिकारी, देवळाली प्रवरा नगरपरिषद) व डी.पी. शेकटकर (नायब तहसीलदार श्रीरामपूर) असतील.

नेवासा नगरपंचायतीकरिता सुधीर पाटील (उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर- नेवासा) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी संजय बिरादार (तहसीलदार, नेवासा) व निखिल फराटे (मुख्याधिकारी, नेवासा नगरपंचायत) असतील.

# सोमनाथ घार्गेनी पाच पोलीस ठाण्यांना दिले नवे प्रभारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगरपालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आदेश काढून जिल्ह्यातील पाच पोलीस ठाण्यांना नवीन प्रभारी अधिकारी दिले आहेत. अहिल्यानगर शहरातील तोफखाना, संगमनेर शहर, पारनेर, जामखेड, राजुर व बेलवंडी पोलीस ठाण्याला नवीन कारभारी मिळाले आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर या बदल्या करण्यात आल्याने जिल्हा पोलीस दलात उलटसुलट चर्चेला उधाण देण्यात आले आहे.

संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांची बदली ए. एच. टी. यु. अहिल्यानगर येथे करण्यात आली असून त्यांच्याकडे पोलीस उपअधीक्षक (गृह) पदाचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला आहे.

दरम्यान, त्यांच्या जागी पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांची बदली करण्यात आली आहे, तर पारनेर पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी जिल्हा विशेष शाखेचे संतोष खेडकर यांची बदली करण्यात आली आहे.

# फूड मदर ममताबाई भांगरे यांनी दारी सजवले तोरण सौभाग्याचे

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



फूड मदर म्हणून जगभर प्रसिद्ध असलेल्या देवगावच्या ममताबाई देवराम भांगरे यांनी नुकत्याच तयार झालेल्या आपल्या शेतातील भात पिकांचा वापर करून सुंदर असे तोरण सजवले आहे. आदिवासी संस्कृती आणि कला यांचा सुंदर मिलाप असलेली ही कलाकृती येणाऱ्या पिढीला ही माहीत पडावी तसेच आपण शेतात पिकवत असलेल्या अन्नधान्या विषयी कृतज्ञता व्यक्त करून प्रत्येक क्षणाला अन्नदात्याचे मनस्वी आभार मानण्याची ही अनोखी परंपरा आदिवासी समाजामध्ये वर्षानुवर्ष जतन करण्यात आलेली आहे. ममताबाई या परसबाग लागवड व परसबाग चळवळीच्या आदिवासी भागातील प्रणेत्या मानल्या जातात. हजारो गरीब शेतकरी आणि आदिवासी शेतकऱ्यांना त्यांनी सेंद्रिय शेतीचे मार्गदर्शन करून विषमुक्त अन्न पीकवण्याच्या मोहिमेला मोठी बळकटी दिली आहे. त्यांच्या या कार्याची देश आणि विदेशातही नोंद घेण्यात आलेली आहे.

अत्यंत गरीब परिस्थितीतून समोर येत त्यांनी सेंद्रिय शेती तसेच पारंपरिक बियाणे संवर्धनासाठी मोठे योगदान दिलेले आहे. हजारो तरुण शेतकऱ्यांच्या त्या मार्गदर्शक आहेत. पर्यावरणाला आणि निसर्गाला धरून त्यांनी उभे केलेले शेतीचे व परसबागेचे मॉडेल पाहण्यासाठी हजारो अभ्यासक आणि शेतकरी त्यांच्या शेताला भेट देत असतात. त्यातच दिवाळीचा हंगाम आणि शेतात नवीन आलेली भातांची रास यांचा स्वाभिमान मिरवणारे तोरण दारी लागल्याने घर आणि परिसराची शोभा वाढली आहे. तोरण विणण्याची कला त्यांना त्यांच्या आईकडूनच प्राप्त झालेली आहे त्यांच्याप्रमाणे त्यांच्या मुलीही अत्यंत सुंदर अशा बीज रांगोळ्या आणि तोरण तसेच विविध हस्तकला निसर्गातील विविध वस्तूंचा वापर करून तयार करत असतात. ममताबाई भांगरे यांना बायफ या आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त संस्थेचे मार्गदर्शन आणि मदत लागली आहे.

# रुंदीकरणासाठी रोतजमीन देण्यास स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध



**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

घोटी ते त्र्यंबकेश्वर या राष्ट्रीय राज्य महामार्गाच्या वाढीव रुंदी करणासाठी एक इंचही जागा देणार नसल्याचा स्थानिक शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे. या पाश्वभुमीवर इगतपुरी तालुक्यातील कुर्णोली येथे घोटी - त्र्यंबकेश्वर राष्टीय राज्य महामार्ग १६० अ बाधित शेतकरी कृती समितीच्या वतीने कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. घोटी ते त्र्यंबकेश्वर महामार्गात येणाऱ्या प्रत्येक गावातील स्थानिक शेतकरी आता एकवटले असुन रस्त्यासाठी शासनाला मोजमाप करू दिले जाणार नसल्याचा ठराव या बैठकीत घेण्यात आला अशी माहिती कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर यांनी दिली. शासनाने बळजबरीने मोजणी करण्यास आमची हरकत असून रस्त्यासाठी शेतजमीन दिल्यास शेतकरी भुमिहीन झाल्याशिवाय राहणार नाही. जमीन नसेल तर शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येणार असल्याने रस्तासाठी जमीनी देण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणाला कायम विरोध असून सर्व शेतकरी यांच्या वतीने पुन्हा एकदा ठराव पारित करण्यात आला. या बैठकीला कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर, उपाध्यक्ष सोपान परदेशी, विवेक कुटके, सचिव गोरख वाजे, सहसचिव ॲड. भारत कोकणे, खजिनदार भास्कर पाचरणे, ॲड. हनुमान मराडे, ॲड. पंढरीनाथ गायकर, क्षीरसागर, कुंडलिक जमधडे, नंदू जमधडे, ज्ञानेश्वर गटकळ, अंकुश महाले, बाजीराव तांबे, सरपंच विलास जोशी, संतोष टमके, पोलीस पाटील, ज्ञानेश्वर चव्हाण, चेतन जोशी, रोहिदास जमधडे, पपू कडू यांच्यासह बाधित शेतकरी उपस्थित होते.

# जोरदार मोर्चे बांधणी करीत शक्तिप्रदर्शन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुका महाविकास आघाडीने जि.प. व पंचायत समितीच्या निवडणुकीत आघाडी घेत जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दिवाळी फराळच्या निमित्ताने नगर तालुक्यातील कार्यकर्त्यांचे म्हणणे जाणुन घेत इच्छुकांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत मुलाखती दिल्या. यामुळे नगर तालुक्यात निवडणुकांचे बिगुल वाजल्याने राजकारण चांगलेच तापले आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख व नगर तालुका महाआघाडीचे नेते प्रा. शशिकांत गाडे यांनी आज अहिल्यानगर शहरात दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी नगर तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गट व बारा पंचायत समिती गणांचा गटनिहाय आढावा बैठकीचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा. निलेश लंके, माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे , प्रा. गाडे व कॉंग्रेसचे जेष्ठ नेते संपतराव म्हस्के यांनी तालुक्यातील गटनिहाय व गणनिहाय इच्छुकांचे उमेदवारी मागणी अर्ज भरून घेत प्रमुख कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले.

# नगर तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी शरद पवार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्याच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी खासदार निलेश लंके यांची विश्वासू सहकारी चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार यांची निवड आज करण्यात आली.



सरपंच शरद पवार यांनी अनेक दिवसापासून सर्व सामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे शासन दरबारी मांडलेले आहेत.आणि निश्चित अहिल्यानगर तालुकाध्यक्ष पदाची त्यांच्याकडे धूरा आल्याने पक्षाची विचारधारा घेऊन सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवतील व ते शासन दरबारी लढतील असा आमचा विश्वास आहे. **- खासदार निलेश लंके साहेब.**

सरपंच शरद पवार सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणारा संघर्षातून पुढे आलेला तरुण सरपंचाला तालुका अध्यक्ष पदाची संधी दिल्याने निश्चित पक्षाला,महाविकास आघाडीला फायदा होईल.

**- माजी मंत्री प्राजक्त तनपुरे.**

यावेळी प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार व खासदार निलेश लंके व माजी मंत्री प्राजक्त दादा तनपुरे,ज्येष्ठ नेते किसनराव लोटके,जि प सदस्य माधवराव लामखडे,बाळासाहेब हराळ, सरचिटणीस सिताराम काकडे,उपाध्यक्ष प्रकाश पोटे,उद्धवराव दुसुंगे,शरद बडे. केशव तात्या बेरड,पापामिया पटेल,चंदूकाका पवार,यांनी तालुकाध्यक्ष पदाचे पत्र दिले.

यावेळी महाविकास आघाडीचे नेते व शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे सर, कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संपतभाऊ मस्के,जिल्हा परिषद उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके,बाजार समितीचे माजी चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, ज्येष्ठ नेते आबा कोकाटे सर,शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र भगत,माजी सभापती प्रवीण कोकाटे,कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अरुण मस्के,डॉ मारुती ससे,गणेश तोडमल,महेंद्र शेळके,पोपट निमसे,संदीप कोकाटे, महादेव खडके,गटनेते वैभव कोकाटे,संदीप काळे, प्रकाश कांबळे,बाबा सय्यद, संतोष कोकाटे यांच्यासह नगर तालुक्यातील अनेक गावातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शरद पवार यांनी बोलताना सांगितले की देशाचे नेते व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाहू, फुले, आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराने चालत असलेल्या महाराष्ट्रात यापूर्वीही पक्षाचे ध्येय धोरण व सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडले. आणि आज त्याची पावती म्हणून माझ्यावर विश्वास टाकून तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली.

# ‘स्मार्ट सुनबाई’ चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

मुंबई : (समर्थ गांवकरी)

विनोदाच्या सागरात लपलेलं रहस्याचं बेट, शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित 21 नोव्हेंबर 2025 ला प्रदर्शित होत असलेल्या बगलामुखी देवी, नलखेडा, मध्य प्रदेश येथे लॉन्च करण्यात आला .

मराठी चित्रपटसृष्टीत नव्या उत्साहाची लाट निर्माण करत ‘स्मार्ट सुनबाई’ या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. आकर्षक दृश्यरचना, प्रभावी संवाद आणि नात्यांच्या गुंतागुंतीतून उलगडणारी कथा या ट्रेलरमधून झळकते.




महाराष्ट्रीय सण-उत्सवांच्या रंगांनी सजलेलं वातावरण, रहस्याची झलक, कौटुंबिक विनोद आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली ही कथा प्रेक्षकांना कधी हसवते तर कधी विचार करायला लावते.

विशेष म्हणजे या ट्रेलरचं लाँच सर्व टीमच्या उपस्थितीत बगलामुखी देवी मंदिर, नलखेडा, मध्य प्रदेश येथे प्रदर्शित करण्यात आला .

शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित 'स्मार्ट सुनबाई' हा आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांसाठी एक संपूर्ण कौटुंबिक मेजवानी ठरणार आहे! सिनेमाच्या ट्रेलरने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे.

चित्रपटातील रोमँटिक गीतांचा गोडवा या कथेला नव्या रंगात रंगवतो आणि प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं भावविश्व निर्माण करतो. हसवणूक, रहस्य आणि कौटुंबिक नात्यांच्या गुंतागुंतीच्या वातावरणातही या सुरेल गाण्यांनी प्रेम आणि भावना यांची एक सुंदर छटा निर्माण केली आहे. प्रत्येक गाणं हे कथानकाच्या प्रवाहाशी घट्ट जोडलेलं असून, ते पात्रांच्या भावनांना अधिक खोली देतं. ‘स्मार्ट सुनबाई’ मध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील अनुभवी कलाकारांची झगमगती फळी एकत्र आली आहे.



मंचर : तांबडेमळा (ता. आंबेगाव) येथील पीरवस्ती परिसरात दिवसाढवळ्या घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने बंद घराचा कडीकोयंडा तोडून सुमारे ३ लाख ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शनिवार दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते साडेबारा या वेळेत ही घरफोडी घडली. कैलास किसन भोर यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्याने बेडरूममधील लोखंडी कपाट फोडले. कपाटातील लॉकरमधून २ लाख ९५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि ९० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ३ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला. या प्रकरणी कैलास भोर यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास महिला पोलीस रागिनी कराळे करत आहेत. या चोरीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### जेएन पेटिट, द कल्याणी स्कूलची दमदार कामगिरी

पुणे (स. गांवकरी) : लोयोला फुटबॉल कप २०२५ स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी जेएन पेटिट टेक्निकल स्कूलने त्यांचे सर्व सामने जिंकून दमदार कामगिरी केली. कल्याणी स्कूल संघानेही कमालीचे सातत्य राखले. पाषाण येथील लोयोला एचएस मैदानावर टाटा ऑटोकॉम्पचे प्रायोजकत्व लाभलेल्या स्पर्धेत बुधवारी सुरुवातीच्या सामन्यात, जेएन पेटिटने ह्यूम मॅकहेन्रीविरुद्ध १०-० च्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. चार गोल करणारा दक्ष पिल्ले (४', १५', ३५', ५२') हा जेएन पेटिटच्या विजयाचा मुख्य शिल्पकार ठरला. दक्ष याला हितेन शेंडगे (५व्या मिनिटाला), दानिश गोनल (२५व्या मिनिटाला), सिद्धार्थ जगदाळे (३२व्या मिनिटाला), नील वाघ (३८व्या मिनिटाला), ऋग्वेद घुले (४९व्या मिनिटाला) आणि पार्थ सोनवणेची (५५ व्या मिनिटाला) चांगली साथ लाभली. त्यानंतर, १४ वर्षांखालील गटात, जेएन पेटिटने ह्यूम मॅकहेन्रीवर ६-० अशी मात केली. अधिराज बिरंजेने (२६ व्या मिनिटाला, ३६ व्या मिनिटाला, ३९ व्या मिनिटाला आणि ५० व्या मिनिटाला) चार गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला. तन्विश खैरनारने (३ व्या मिनिटाला, ४१ व्या मिनिटाला) दोन गोल करत त्याला चांगली साथ दिली. १२ वर्षांखालील गटामध्ये ह्यूम मॅकहेन्रीचा २-० असा पराभव करून जेएन पेटिटने त्यांचा तिसरा विजय नोंदवला. अता शेख (२७ व्या मिनिटाला) आणि अगस्त्य बर्डेने ३४ व्या मिनिटाला) प्रत्येकी एक गोल करत विजय सुकर केला.

### भारतीय हॉकीच्या १०० वर्षांच्या सन्मानार्थ अनेक सामन्यांचे आयोजन

पुणे (स. गांवकरी) : हॉकी महाराष्ट्र हा त्याच्या इतर संलग्न युनिट्ससह गुरुवार, ७ नोव्हेंबर रोजी हॉकी इंडियाच्या शतकमहोत्सवी सोहळ्यासाठी सज्ज आहे. हा दिवस या उल्लेखनीय शतकाचे प्रतीक आहे, ज्याची सुरुवात १९२५ मध्ये याच दिवशी झाली होती. जेव्हा भारतीय हॉकी एफआयएचशी संलग्न झाली आणि त्यानंतर राष्ट्रीय अभिमानाचा जन्म झाला. ७ नोव्हेंबर रोजी हॉकी महाराष्ट्राने आपल्या कार्यक्रमात हा दिवस भारतीय हॉकीच्या या उल्लेखनीय क्षणाचा उत्सव साजरा करण्यासाठी राखीव ठेवला आहे. या दिवशी हॉकी महाराष्ट्राचे ३५ जिल्हे प्रत्येकी २ सामने खेळतील आणि त्या दिवशी ७० सामने 'लाइव्ह सबमिशन' सादर केले जातील. जिल्हा युनिट्सद्वारे आयोजित केले जाणारे सामने शाळा, महाविद्यालये, क्लबसाठी आयोजित केले जातील जे हॉकी चळवळीचा भाग बनू इच्छितात. या उत्सवात ५९ पुरुष संघ आणि ४९ महिला खेळाडू असे एकूण १,९३५ खेळाडू सहभागी होतील. या उत्सवात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून ५४ सामने (३० पुरुष आणि २४ महिला) सहभागी होतील. हे एकाच वेळी होणारे सामने सकाळी ८.०० ते दुपारी १२ वाजेपर्यंत त्यांच्या संबंधित जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्याचे नियोजन आहे.

### उत्कृष्टतेकडे वाटचाल छोट्या सवयींपासूनच सुरू होते - राहुल द्रविड



पुणे (स. गांवकरी) : “खेळात विजय मिळवायचा असेल, तर त्याची सुरुवात ही दैनंदिन सवयींपासूनच होते. जसे की, तोंडाचे आरोग्य राखणे ही एक छोटी वाटणारी, पण फार महत्त्वाची सवय आहे,” असे मत माजी क्रिकेटपटू आणि भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी व्यक्त केले. ‘ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स’ या कार्यक्रमाच्या नुकत्याच झालेल्या भागात द्रविड यांनी खेळाडूंच्या सर्वोत्तम कामगिरीत मौखिक आरोग्याची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, स्पर्धात्मक खेळांमध्ये आज “सर्वात छोट्या गोष्टींकडे लक्ष देणे” हे यशाचे खरे गमक ठरत आहे. “उत्कृष्टता साध्य करायची असेल, तर खेळाडूच्या केवळ शारीरिक क्षमतेकडे पाहून चालणार नाही. त्याच्या एकूण आरोग्यात, विशेषतः तोंडाच्या स्वच्छतेत मोठा फरक पडतो. आज स्पर्धात्मक खेळ हे एका टक्क्याच्या फरकावर ठरतात, आणि त्या एका टक्क्यात मौखिक आरोग्याचाही वाटा आहे,” असे द्रविड म्हणाले. जागतिक स्तरावरील उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, “एफसी बार्सिलोनाचे प्रशिक्षक हांसी फ्लिक यांनी खेळाडूंना नियमित शारीरिक तपासणीसोबत तोंडी आरोग्य तपासणी अनिवार्य केली आहे. यामुळे खेळाडूंना दीर्घकाळ सर्वोत्तम कामगिरी करता येते.” द्रविड पुढे म्हणाले, “आपण याबाबत फार विचार करत नाही. पण मी यावर संशोधन पाहिलं, तेव्हा लक्षात आलं की तोंडातील संसर्ग किंवा वेदना शरीराच्या इतर भागांवर परिणाम करू शकतात. जर तुम्ही स्वतःकडे व्यावसायिक खेळाडू म्हणून पाहत असाल, तर तुमच्या मौखिक आरोग्याकडेही तितकंच लक्ष दिलं पाहिजे.” आपल्या खेळाडू म्हणूनच्या अनुभवाची आठवण करून देताना ते म्हणाले, “कधी कधी अगदी छोट्या गोष्टींकडे लक्ष दिल्याने मोठा फरक पडतो. आजकाल खेळाडू आहार, विश्रांती, आणि तोंडाची स्वच्छता या सर्व बाबींची काळजी घेतात. कारण या छोट्या सवयीच अखेरच्या क्षणी विजयाचा निर्णय ठरवू शकतात.”

# श्रद्धा आणि सेवा या आधारस्तंभांवर साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी

**आयुक्त यशवंत डांगे**

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)





वसंत टेकडी येथील संदेश नगर मधील साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दर महिन्याच्या अखेरच्या गुरुवारी आयोजित करण्यात येणारी ‘साईनाथ भजन संध्या’ मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमात भाविकांनी साईनामाचा अखंड जयघोष करीत भजनांच्या माध्यमातून भक्तीभावाने साईनाथांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप महाआरतीने करण्यात आला. ही महाआरती अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते पार पडली. यावेळी नगरसेवक सुनील नारायण त्र्यंबके, बाळासाहेब पवार, शंतनु वाने, विकी करोलिया, शहाणे काका, संदीप कोरोलिया, आणि निखिल त्र्यंबके यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात आयुक्त मा. यशवंत डांगे म्हणाले की, “साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानने समाजात धार्मिकतेबरोबरच सामाजिक कार्याचा सुंदर संगम साधला आहे. श्रद्धा आणि सेवा या दोन आधारस्तंभांवर उभी राहिलेली ही संस्था अहिल्यानगरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी आहे. विशेष म्हणजे नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी साई सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून नागरिकांना मदतीचा हात देत, धार्मिक आणि सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजात एकात्मतेचा आणि सद्भावनेचा संदेश पसरत आहे.”

तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, “महानगरपालिकेच्या माध्यमातून आम्ही अशा समाजोपयोगी संस्थांना नेहमीच सहकार्य करू. साईनाथांच्या कृपेने शहरात सकारात्मकता, भक्ती आणि सेवाभाव वाढावा, हीच आपली अपेक्षा आहे.”

या कार्यक्रमात नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी सुद्धा आपले विचार मांडले. ते म्हणाले, “साईनाथ भजन संध्या हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो समाजातील ऐक्य आणि भक्तीचा उत्सव आहे. साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून आम्ही नेहमीच दुर्बल घटकांना सहाय्य करण्याचा आणि समाजात चांगुलपणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला आहे. नागरिकांनी साईनाथांच्या उपदेशाप्रमाणे ‘श्रद्धा आणि सबुरी’ या दोन मूल्यांचा अंगीकार करून समाजकार्यात सहभागी व्हावे, हीच आमची अपेक्षा आहे.”

या कार्यक्रमात उपस्थित सर्व भक्तांना प्रसाद वितरण करण्यात आले. वातावरणात साईनामाचे गजर, ताल-मृदंगाचा नाद आणि भक्तीचा ओलावा सर्वत्र दरवळत होता. श्रद्धा, भक्ती आणि सेवेचा मिलाफ असलेल्या या ‘साईनाथ भजन संध्येला’ उपस्थित मान्यवरांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वजनदार मुलांची हाडे कमकुवत

पुणे : (समर्थ गांवकरी)

- बालपणातील लठ्ठपणाचे छुपे दुष्परिणाम

‘युनिसेफ’च्या अलीकडील ‘चाइल्ड न्युट्रिशन रिपोर्ट’नुसार, जगभरातील शाळकरी मुलांमध्ये आता लठ्ठपणाचे प्रमाण अधिक झाले आहे. सुमारे १८.८ कोटी मुले लठ्ठपणाशी झुंज देत आहेत. भारतही या प्रवाहाचा भाग आहे. ‘युनिसेफ’च्या अंदाजानुसार, सन २०३० पर्यंत सुमारे ४४ कोटी भारतीय मुलांना लठ्ठपणाची समस्या भेडसावणार आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाला पंतप्रधानांनी ‘लठ्ठपणा हे एक छुपे संकट आहे,’असा इशारा दिला होता.बालपणीचा लठ्ठपणा ‘टाइप टू डायबिटीस’, उच्च रक्तदाब, फॅटी लिव्हर, झोपेत श्वसनाचा त्रास (स्लीप ॲप्निया), मानसिक ताण; तसेच मोठेपणी हृदयरोग, कर्करोग आणि अकाली मृत्यूची शक्यता वाढवतो. जागतिक आकडेवारीनुसार १९९०पासून मुलांमध्ये आणि किशोरवयीनांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. या संदर्भा निर्णायक पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे. सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉ. साजिली मेहता, कन्सल्टंट पेडियाट्रिक एन्डोक्रिनॉलॉजी म्हणाल्या "या विषयावर चर्चा होताना निष्क्रिय जीवनशैली आणि प्रक्रिया केलेल्या (प्रोसेसस्ड फूड) अन्नाच्या अति सेवनावर भर दिला जातो.

# १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित 'रील स्टार'

- 'रील स्टार'चा अनोखा, संघर्षमय, प्रेरणादायी प्रवास रुपेरी पडद्यावर

पुणे : (समर्थ गांवकरी)



काही चित्रपट मनोरंजनाच्या माध्यमातून वास्तव जीवनाचे यथार्थ दर्शन घडवत अंतर्मुख करतात. त्यापैकीच एक असलेल्या 'रील स्टार' या आगामी मराठी चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाबाबतचे कुतूहल अधिक वाढले असून, संगीत प्रकाशनानंतर या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या मनात रुंजी घालू लागली आहेत. प्रेक्षकांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी हा चित्रपट १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सशक्त कथानक, कसदार अभिनय, नेत्रसुखद सादरीकरण, प्रयोगशील दिग्दर्शन, सुमधूर गीत-संगीत अशा बऱ्याच वैशिष्ट्यांनी नटलेला 'रील स्टार' प्रेक्षकांचे परिपूर्ण मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटात रील स्टारची गोष्ट पाहायला मिळणार हे शीर्षकावरून सहज लक्षात येते. आजचा जमाना रील स्टारचा आहे. आज मनोरंजनासोबतच समाजात घडणाऱ्या घटना आणि जनमानसांत उमटणारे प्रतिबिंब टिपण्याचे काम रील स्टार करत आहेत. 'रील स्टार' चित्रपटामध्ये भानुदास नावाच्या रस्त्यावरील एका विक्रेत्याची आणि त्याच्या कुटुंबाची कथा आहे. हा चित्रपट म्हणजे भानुदासच्या स्वप्नपूर्तीचा अनोखा प्रवास आहे. स्वप्नांना गवसणी घालताना त्याने दिलेला लढा पाहण्याजोगा असून, अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. भारतातील काही सर्वोत्तम चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या मल्याळम चित्रपट उद्योगातील तंत्रज्ञांची निर्मिती असलेला हा पहिला मराठी चित्रपट आहे. जोस अब्राहम, मोनिका आणि निशील कंबाती यांनी जे-फाइव्हज एंटरटेनमेंट्स, फिनिक्स ग्रुप आणि इनिशिएटिव्ह फिल्म्सच्या बॅनरखाली 'रीलस्टार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. मल्टीस्टारर हिंदी-मराठी 'अन्य' या चित्रपटाचे दिग्दर्शक सिम्मी आणि रॉबिन यांनी 'रील स्टार'चे दिग्दर्शन केले आहे.

# वस्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई : गावठी पिस्तूलसह दोघे ताब्यात!



वसमत : (समर्थ गांवकरी)

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अवैध अग्निशस्त्र धारकांविरोधात विशेष मोहिम राबविण्याच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वसमत शहरात मोठी कारवाई करत गावठी पिस्तूलसह दोघांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे यांचे पथक वसमत शहरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की दोन गुन्हेगार गावठी पिस्तूल घेऊन शहरात फिरत आहेत. तत्काळ पोलीस पथकाने छापा टाकून बसस्थानक परिसर, वसमत येथून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता आरोपी श्रीकांत उर्फ टिल्ल्या बाबुराव सांडे (वय २५, रा. बुधवार पेठ, वसमत) याच्या कंबरेला एक गावठी पिस्तूल आढळून आले.

# झिग्लीचा विस्तार, पाळीव प्राणी संगोपन केंद्र केले सुरू

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील पहिला तंत्रज्ञान-सक्षम ओम्निचॅनेल - पाळीव प्राण्यांची काळजी घेणारा ब्रँड, झिग्लीने (कॉस्मो फर्स्ट लिमिटेड) महाराष्ट्रातील पुण्यात प्रथमच पाळीव प्राण्यांसाठी संगोपन केंद्र सुरू करत आपला विस्तार केला आहे. शहरातील पाळीव प्राण्यांच्या पालकांसाठी झिग्लीची विश्वासार्ह, पाळीव प्राण्यांची संपूर्णपणे काळजी घेणारी यंत्रणा आणत असताना, हा टप्पा संपूर्ण भारतातील झिग्लीच्या वाढत्या उपस्थितीचे प्रतीक आहे. दुकान क्रमांक 5, व्हीटीपी सेलेस्टा, एनआयबीएम ॲनेक्स, विबग्योर स्कूल रोड, मोहम्मद वाडी येथे स्थित पुण्यातील हे केंद्र पूर्णपणे झिग्लीचा अनुभव देण्याच्या दृष्टीने डिझाइन केलेले आहे - पाळीव प्राण्यांची सर्वसमावेशक काळजी, प्रीमियम पाळीव प्राणी स्पा आणि ग्रूमिंग सेवा, पाळीव प्राण्यांसाठी आवश्यक वस्तू आणि कुत्रे, मांजरी आणि लहान पाळीव प्राण्यांसाठी उच्च-गुणवत्तेच्या उत्पादने, अशा साऱ्याच गोष्टी येथे उपलब्ध होणार आहेत.

# कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्या मुंबई येथील निवासस्थानाला छावा क्रांतिवीर सेनेचा घेराव

## शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी कृषिमंत्रीमंत्री दत्ता भरणे यांचे तात्काळ निर्णयाचे आश्वासन छावा संघटनेचे आंदोलन

मुंबई : (समर्थ गांवकरी)



राज्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे शासन आणि प्रशासन यांचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ छावा संघटनेच्या वतीने शेकडो शेतकरी बांधवांनी नाशिक जिल्ह्यातून थेट मुंबई गाठत कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्या सिद्धटेक निवासस्थानावर मंगळवारी भव्य घेराव आंदोलन छेडले.

या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या – जसे की विमा कंपन्यांची लूट,शेतीमालाला न मिळणारा हमीभाव,थकीत कर्जवसुली, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न मिळणारी मदत,वाढलेले वीजदर आणि शेतीसाठी आवश्यक खत व बियाण्यांची टंचाई दूर करणे बोगस बियाणे उत्पादक कंपन्यांवर कडक कारवाई सर्व प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की,शासनाने या मागण्या तातडीने मान्य केल्या नाहीत,तर संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडले जाईल. कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करून संघटनेच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला.त्यांनी आश्वासन दिले की,शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मांडल्या जातील आणि संबंधित विभागांना तात्काळ जी.आर.काढण्याचे निर्देश दिले जातील. संघटनेने कृषिमंत्री यांच्याकडे सादर केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे थकित व चालू कर्ज तत्काळ स्थगित करणे,उच्च प्रतीचे बी-बियाणे व खते वेळेत उपलब्ध करणे,वीजदरात कपात करणे, नुकसानग्रस्त नाले,विहिरी व शेततळ्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी तयार करणे,पिकविमा कंपन्यांच्या गैरव्यवहारांवर कठोर कारवाई करणे,प्रत्येक तालुक्यात कृषी आपत्कालीन सहाय्यता केंद्र स्थापन करणे आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबांसाठी शेतकरी जीवनरक्षा निधी तयार करणे या मागण्यांचा समावेश आहे.आंदोलनात सहभागी झालेल्या नाशिक सह महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांनी एकमुखाने ठराव केला की,आमच्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केले,तर येणाऱ्या काळात मुंबईतील मंत्रालयासमोर थेट मोर्चा काढला जाईल."असा इशारा दिला.

या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये डॉ विलास पांगरकर , करण गायकर, नितीन शिंदे, दिनकर कोतकर ,डॉ किरण डोके ,नवनाथ शिंदे ,आशिष हिरे गणेश माने ,हर्षद भोसले ,सुभाष गायकर, गोरख संत, प्रवीण पाटील, वैभव दळवी, योगेश पाटील ,भारत पिंगळे ,नाना पालखेडे ,अविनाश तांदळे, रोशन पवार, योगेश गांगुर्डे, किरण लवंड, आकाश जाधव, अमोल देवरे ,गोरख जाधव, सोमनाथ पाटील, दत्ता महाराज पवार ,दत्ता कवडे ,ज्ञानेश्वर कोटकर ,प्रवीण बिलानी, किरण शिंदे, मिथुन हिरे ,नवनाथ जगताप, अविनाश पाटील विविध जिल्ह्यांतील शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.सर्वांनी एकमुखाने शेतकरी जिंदाबाद आणि "छावा क्रांतिवीर सेना एकच दिशा शेतकऱ्यांचा हक्क आणि हक्काची लढाई" अशी घोषणा देत वातावरण दणाणून सोडले.

# कार्तिकी स्नान कार्यक्रमात किर्तन सोहळा : दिवे विसर्जित

**मंचर : (समर्थ गांवकरी)**



आंबेगाव तालुक्यातील विविध गावात त्रिपुरा पौर्णिमेनिमित्त बुधवार दि. ५ रोजी काकड आरती समाप्ती सोहळा झाला. कार्तिकी स्नान कार्यक्रमात नदीपात्रात महिलांनी दिवे विसर्जित केले. कळंब,वर्पेमळा,लौकी,चांडोली बुद्रुक, चांडोली खुर्द, एकलहरे,नांदूर,विठ्ठलवाडी, टाकेवाडी इत्यादी गावांमध्ये काकड आरती समाप्ती सोहळा पारंपारिक पद्धतीने टाळ मृदुंगाच्या गजरात,संत ज्ञानोबा तुकाराम यांचा गजर करत गावातून प्रभात फेरी काढून साजरा करण्यात आला. कळंब येथील अदिशक्ती कमलजादेवी मंदिरात गेल्या २५ वर्षापासून स्वर्गीय ह. भ. प केशव महाराज कबीर यांच्या प्रेरणेने काकड आरती सोहळा सूरू करण्यात आला होता. काकड आरती सोहळा गेल्या दिड महिन्यापासून सुरेखाताई रामदास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. त्रिपुरा पौर्णिमेनिमित्त अभंग,गवळणी आणि ज्ञानोबा तुकाराम महाराज यांच्या ओव्या गाऊन देवीची आरती करून प्रभात फेरी काढण्यात आली.आदिशक्ती कमलजादेवी मंदिरापासून ते कळंब ग्रामपंचायत चौकात प्रभात फेरी काढून ज्ञानोबा तुकाराम यांचा गजर करत ग्रामपंचायत चौकामध्ये महिलांनी फुगड्या खेळून आनंद व्यक्त केला.पवित्र घोडनदी पात्रात दीप प्रज्वलन करून नदीपात्रात दिवे विसर्जित करण्यात आले.यावेळी काकड आरती सोहळा समाप्ती प्रसंगी माजी ग्रामपंचायत सदस्या सविता भालेराव,शिक्षिका सीमा कहडणे, मंगल थोरात,विणेकरी सुमन कानडे,अखंड रांगोळीकार सुलोचना कानडे,अंजनी कानडे, माजी सरपंच गंगाधर कानडे,बाळासाहेब भालेराव, शांताराम थोरात,रामदास शिंदे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय कानडे, प्रशांत गुरव, गेनभाऊ गारगोटे, महादू भालेराव यांच्यासह काकड आरती प्रसंगी उपस्थित होते.प्रसाद पवार आणि सचिन शेळके यांनी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले.



संगमनेर : चाळीस वर्ष हा तालुका आपण परिवार म्हणून सांभाळला. वाईट प्रवृत्ती येऊ दिल्या नाही. मात्र आता कधी न येणारे लोक हिंदुत्वाचा खोटा बुरखा पांघरून संगमनेर मध्ये येऊ लागले आहेत. धर्माच्या नावावर काळे धंदे सुरू केले आहेत. अमली पदार्थांची तस्करी सुरू झाली आहे. या पाठीमागे कुणाचा आशीर्वाद आहे हे ओळखा ,अमली पदार्थांच्या वाढलेल्या तस्करी मागे हप्ते खोरी हे एकमेव कारण असल्याची टीका काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर ते बोलत होते यावेळी मा. आमदार डॉ.सुधीर तांबे, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग पाटील घुले, सौ कांचनताई थोरात, संपतराव डोंगरे, रामहरी कातोरे , डॉ. जयश्रीताई थोरात , शंकरराव खेमनार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांच्यासह अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...

### ओंकार रोकडे याचे सीए परीक्षेत यश



अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील कैलास एकनाथ रोकडे यांचे चिरंजीव ओंकार हा दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत 22व्या वर्षी यशस्वी झाला. ओंकारचे प्राथमिक शिक्षण मुठेवाडगावच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. बारावीनंतरचे शिक्षण पुणे येथे त्याने पूर्ण केले. केपीएमजी येथे त्याने आर्टिकलशिप केली. बीड जिल्ह्यातील अर्धपिंपरी येथील मूळ रहिवासी असलेल्या ओंकार रोकडे यांनी सीए परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांकडून त्याचे अभिनंदन करण्यात आले.

### संगमनेर तालुक्यातील १८ गावांना ट्रान्सफॉर्मर मंजुरी!



संगमनेर (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यातील वीजपुरवठा व्यवस्थेत सुधारणा आणि शेतीसाठी स्थिर व अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने आमदार सत्यजीत तांबे यांच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील १८ गावांना नवीन ट्रान्सफॉर्मर साठी तब्बल दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे, कुंभारवाडी, कोळवडे, घुलेवाडी, जाखोरी, जोर्वे, डिग्रस, तळेगाव, नांदुरी दुमाला, मांडवे बु., मालुंजे, रणखांब वाडी, राजापूर, वरवंडी (जनतानगर), हिवरगाव पावसा, मालुंजे, संगमनेर खुर्द यांसह एकूण १८ गावांचा समावेश आहे. दीर्घकाळापासून वीजदाब कमी होणे यांसह खंडित वीजपुरवठा आणि सिंचनात अडथळे अशा समस्या या भागात कायम होत्या. त्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून आमदार तांबे यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. “संगमनेर तालुक्यातील वीजपुरवठा अधिक सक्षम व्हावा, शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेशी वीज उपलब्ध व्हावी आणि नागरिकांना अखंड सेवा मिळावी असे आमदार तांबे यांनी सांगितले. तसेच जिल्हानियोजनच्या या निधीबद्दल आमदार सत्यजीत तांबे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेही आभार मानले.

### श्री क्षेत्र गोदाधाम सराला बेट दिंडीचे अलंकापुरीकडे प्रस्थान

वडाळा महादेव (स. गांवकरी) : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गोदाधाम श्री क्षेत्र सराला बेट दिंडी चे आज मंहत रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते योगीराज गंगागिरीजी महाराज ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज या संताच्या चरण पादुका पूजन करून गंगाप्रदकशना करून आज सकाळी ११ वाजता बेटातून दिंडीचे अलंकापुरीकडे प्रस्थान झाले. २०० वर्षांपूर्वी योगीराज गंगागिरीजी महाराज यांनी पैठण, आळंदी, पंढरपूर, अशा अनेक वाऱ्या निष्काम भावनेने केल्या लाखो भाविक भक्त बेटाला जोडून ठेवले त्यांच्या परंपरा आजतागायत सुरू असून महंत रामगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक ४ नोव्हेंबर रोजी गोदाधाम श्रीक्षेत्र सरला बेट येथून हजारो टाळकरी भाविक भक्त उपस्थितीत व ग्यानबा तुकारामच्या जयघोषित दिंडीला मंदिर प्रदक्षिणा करून व रथामध्ये सद्गुरूंच्या पादुका पूजन करून दिंडीस प्रारंभ करत करण्यात आला. आज पासून पुढील एकादशीपर्यंत दिंडी मजल दरमजल करत अंलकापुरी मध्ये म्हणजेच आळंदी मध्ये माऊलींच्या दर्शनास जाईल.व १७ नोव्हेंबर रोजी मंहत रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तन ,महाप्रसाद होईल बेटाची दिंडी शिस्तप्रिय दिंडी म्हणून पूर्ण राज्यभर ख्यातीअसून विणेकरी टाळकरी तुळशी वृंदावन आदी सह शेकडो वारकरी दिंडीत सहभागी झाले आहेत दिंडी प्रस्थान प्रसंगी प्रमुख उपस्थिती योगानंद महाराज, रामभाऊ महाराज, विक्रम महाराज साई महाराज सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज आदीसह बेटातील विद्यार्थी शिष्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माणिकडोहफाटा येथे मोटर सयकल अपघातात एक निधन

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर पोलीस स्टेशन येथे शिवाजी वामन ढोबळे रा. माणिकडोह यांनी फिर्याद दिली की, जुन्नर शहर हद्दीत ओतूर ते जुन्नर जाणारे रोडवर माणिकडोह फाटा चौकात मोठा अपघात झाला आहे . या ठिकाणी आठवड्यापूर्वी येथील परिसरातील सरपंच उपसरपंच ग्रामस्थ पोलीस पाटील व शेतकरी बांधव यांनी या ठिकाणी लवकरात लवकर रिंग सर्कल व स्पीड बकर ची मागणी केलेली होती . याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग जुन्नर सातत्याने येथील समस्या बाबत दुर्लक्ष का ? करत आहे , अशी चर्चा शेतकरी बांधवांमध्ये सुरू आहे . याबाबत फिर्याद यांनी सांगितले की, बजाज डिस्कव्हर मोटारसायकल क्र. एम एच १४ सी बी ८६७८ यांवरील चालक अक्षय शंकर मोजाड रा. सितेवाडी यांने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे रोडचे परिस्थितीकडे दुर्लक्ष केले . मोटारसायकल वेगवान बिंदास्त चालवून समोरून येणारे स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम एच १२ डी बी ५१९१ हिला समोरून धडक मारून अपघात केला. या अपघातात मोटार सायकल चालक शंकर वामन ढोबळे वय ५८ वर्षे रा. माणिकडोह डोक्याला व तोडाला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला आहे. अक्षय शंकर मोजाड मोटरसायकल चालक रा. शीतेवाडी यांच्या विरुध्द गुन्हा रजिस्टर नंबर ३५३ /२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१,१२५( ऐ ), १२५(बी),१०६(१)३२४(४) , मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा काळे पुढील तपास करीत आहे.

# ‘बाई तुझ्यापायी’ची संकल्पना साजरी करण्यासाठी खास वॉल म्युरल (भित्तिचित्र) सादर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



नवी मराठी सीरीज बाई तुझ्यापायी मुळे घडून येत असलेला बदल साजरा करण्यासाठी मराठी ZEE5 ने विचारांना चालना देणारे एक म्युरल मुंबईच्या मध्यवर्ती भागात वसवले आहे. ही सीरीज धाडस, व्यवस्थेविरोधात आवाज उठवणे आणि क्रांती घडवणे अशा संकल्पनांवर आधारित असून त्याला आदरांजली वाहण्यासाठी हे म्युरल उभारण्यात आले आहे.

ही आकर्षक कलाकृती सीरीजची भावना मांडणारी आहे – या सीरीजमधे एक तरुण मुलगी फळ्यापुढे उभी राहून मुलं – 20, मुली – 1 असं वाचताना दिसते. हा प्रसंग देशभरातील शाळांमधे दिसून येणाऱ्या लिंगभेदाची आठवण करून देणारा आहे. तिच्याजवळच अहिल्या आणि तिची आई लक्ष्मी यांची प्रतिमा दिसते – प्रेम, जिद्द आणि चिकाटीनं जोडल्या गेलेल्या दोन स्त्रिया समाजानं घालून दिलेल्या मर्यादा पार करून स्वप्नं पाहाण्याचं धाडस करत असतात. हे म्युरल बाई तुझ्यापायी या सीरीजच्या संकल्पनेला आदरांजली वाहणारं आहे – ही कथा प्रेक्षकांना विचार करण्याची, मागे वळून पाहण्याची आणि स्त्रियांसाठी छोटंसं स्वप्नही खूपदा का इतकं अवघड असतं असा विचार करायला लावणारी आहे.

निपुण धर्माधिकारी यांचं दिग्दर्शन आणि साजिरी जोशी, क्षिती जोग, सिद्धेश धुरी यांचा जबरदस्त अभिनय असलेली बाई तुझ्यापायी ही सीरीज 1990च्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या एका लहानशा खेड्यात घडते. या सीरीजमधे अहिल्या नावाच्या एका लहान मुलीची समाज बंधनं घालत असतानाही शिक्षण सुरू ठेवण्याची व डॉक्टर बनण्याची जिद्द दिसून येते. तिच्या जगात मुलींसाठी शिक्षण बऱ्याचदा अनावश्यक मानलं जात असतं – आणि अहिल्या व तिच्यासारख्या कितीतरी मुलींना पाळी सुरू झाल्यावर शाळा सोडावी लागते. या पार्श्वभूमीवर अहिल्याचा ज्ञानाचा ध्यास शांतपणे सुरू राहातो.

प्रदर्शित झाल्यापासून बाई तुझ्यापायी सीरीजला प्रेक्षक तसेच समीक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या सीरीजची अस्सलता, भावनिक खोली आणि पितृसत्ताक व्यवस्थेला छेद देऊ पाहाणाऱ्या आई- मुलीच्या नात्याचं चित्रण यांचं कौतुक करत आहेत. या सीरीजद्वारे लिंगभेद, शिक्षण आणि ग्रामीण भारतातील अगणित मुलींच्या खुडल्या गेलेल्या स्वप्नांविषयी चर्चा होत आहे.

क्षिती जोग म्हणाल्या, ‘बाई तुझ्यापायी ही सीरज माझ्या करियरमधल्या सर्वात अर्थपूर्ण अनुभवांपैकी एक आहे. हा अनुभव म्युरलद्वारे प्रतीत होताना पाहाणं आनंददायी आहे. ही केवळ अहिल्याची कथा नाही, तर स्वतःला जे आवडतं ते करू पाहाणाऱ्या प्रत्येक स्त्रीची, प्रत्येक आईची आहे. ही केवळ एक कलाकृती नाही, तर ते जिद्द, प्रेम आणि बदलावर असलेल्या विश्वासाचं प्रतीक आहे. लक्ष्मीमधली आई विश्वास आणि स्वातंत्र्य यांच्यात अडकलेली आहे. मला आशा आहे, की ही सीरीज प्रेक्षकांना एखादं लहानसं धाडसही कित्येक पिढ्यांना प्रकाश देऊ शकतं याची आठवण करून देईल.’

साजिरी जोशी म्हणाल्या, ‘आज या सुंदर म्युरलपुढे उभं राहाताना माझं मन भावूक झालं आहे. बाई तुझ्यापायी ही सीरीज धाडस आणि बदलाचा प्रवास मांडणारी आहे – केवळ अहिल्याचाच नव्हे, तर रूढ व्याख्यांवर प्रश्नचिन्ह उभं करणाऱ्या प्रत्येकीचा प्रवास याच चित्रित झाला आहे.

तिची गोष्ट अशाप्रकारे एखाद्या कलाकृतीद्वारे मांडली जाणं हे जणू तिचा आवाज पडद्याबाहेर पडून प्रत्यक्ष युगात श्वास घेत असल्यासारखं आहे. हे म्युरल प्रश्न उभे करणाऱ्या आणि भीतीवर मात करत धाडस दाखवणाऱ्या प्रत्येक स्त्रीची जिद्द साजरं करणारं आहे. मला आशा आहे, की हे म्युरल लोकांना खरा बदल एका धाडसी प्रश्नातून सुरू करण्याची प्रेरणा देणारं आहे.’

# मंचर बाजार समितीत सोयाबीन हमीभाव नोंदणी सुरू

**मंचर: (समर्थ गांवकरी)**

मंचर बाजार समितीत सोयाबीन या पिकाचे हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असून यासाठीची नोंदणी सुरू झाली आहे.शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी करावी.असे आवाहन सभापती निलेश थोरात यांनी केले आहे. केंद्र सरकारने 2025 - 26 या वषार्साठी सोयाबीनसाठी प्रति क्विंटल 5328 रुपये इतका हमीभाव घोषित केला आहे.खरीप हंगामातील सोयाबीन पिकांची केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत खरेदी सुरू करण्यासाठी नाफेड अंतर्गत कृषि पणन मंडळ यांच्या वतीने मंचर बाजार समिती मध्ये खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हमीभावाने सोयाबीन खरेदी केली जाणार आहे.यासाठी शेतकऱ्यांनी येथील बाजार समितीच्या कार्यालयात हमीभावाने सोयाबीन विक्री करण्यासाठी नोंदणी सुरू आहे.हमीभावाने सोयाबीन विक्री नोंदणीसाठी सातबारा उतारा(सोयाबीन पीक पेरा नोंद 2025), आधारकार्ड व आधारला लिंक असलेला मोबाईल घेऊन शेतकऱ्यांनी स्वतः बाजार समितीत येऊन नोंदणी करावी, असे आवाहन मंचर बाजार समिती सभापती निलेश थोरात व उपसभापती सचिन पानसरे यांनी केले आहे.

# एण्ड टीव्ही कलाकारांनी आठवणी व परंपरांबाबत सांगितले!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



देवांचा दिव्यांचा सण म्हणून ओळखला जाणारा देव दीपावली भारतातील सर्वात दिव्य आणि मनमोहक सण आहे. दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी साजरा केला जाणाऱ्या या पवित्र सणानिमित्त वाराणसीच्या घाटावर अनेक दिवे, उत्साही प्रथा आणि हृदयस्पर्शी भक्ती पाहायला मिळते. लाखो व्यक्ती गंगा नदीकाठी हे दिव्य दृश्य पाहण्यासाठी येणार असताना एण्ड टीव्हीवरील कलाकार पारस अरोरा (जीतू, घरवाली पेडवाली), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन) आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, भाबीजी घर पर है) यांनी या तेजस्वी सणाबाबत त्यांच्या गोड आठवणी, कौटुंबिक प्रथा आणि आध्यात्मिक संबंधांबाबत सांगितले. एण्ड टीव्हीवरील आगामी मालिका घरवाली पेडवालीमध्ये जीतूची भूमिका साकारताना पाहायला मिळणारे पारस अरोरा म्हणाले, देव दीपावली सण माझ्यासाठी नेहमी जादुई अनुभव राहिला आहे. माझे मूळगाव बरेलीमध्ये आम्ही जवळच्या मंदिरामध्ये आरती करत दिवसाची सुरूवात करतो, ज्यानंतर पणत्यालावून आमच्या घराला सजवतो. माझी आई व मी प्रसाद तयार करतो आणि बाल्कनीमध्ये दिवे लावतो, जे दैवी ऊर्जेच्या स्वागताचे प्रतीक आहे. मी बालपणापासून एका प्रथेचे पालन करत आहे, ती म्हणजे घरी भांड्यामध्ये पाणी घेऊन त्यावर लहान दिवा तरंगतठेवणे. ते पाहिल्यानंतर असे वाटते की, आमच्या घराच्या दरवाज्यावर घाटाचे दृश्य पाहायला मिळत आहे. मी यंदा शूटिंगमध्ये व्यस्त असलो तरी माझी मालिका घरवाली पेडवालीच्या सेटवर हा सण साजरा करणार आहे, जेथे आम्ही एकत्र दिवे लावू आणि एकत्र मिठाईचा आस्वाद घेऊ. माझ्यासाठी देव दीपावली म्हणजे भक्ती, कृतज्ञता आणि अंतर्गत मनाला उत्साहित करणे.

मालिका हप्पू की उलटन पलटनमध्ये राजेशची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय गीतांजली मिश्रा म्हणाल्या, बालपणी देव दीपावली वर्षातील सर्वात सुरेख रात्र असायची. मला आठवते, मी सकाळी लवकर उठून माझ्या आई-वडिलांसोबत मंदिरामध्ये जायची आणि माझ्या आईला एका रांगेत शेकडो दिवे लावण्यामध्ये मदत करायची.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी जवळ्यात प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



शाळेच्या पहिल्याच दिवशी लोहा तालुक्यातील जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत चिमुकल्यांनी प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी केली. शाळा आणि शाळा परिसरातील कचरा गोळा करून तो पेटवून दिला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, संगिता बडवणे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुका कचरा गोळा केला. यासाठी वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी मदत केली. कुणीही प्लास्टिकच्या वस्तू वापरु नयेत, प्लास्टिकला नाही म्हणा असा संदेश यांद्वारे व सोशल मीडियाद्वारेही दिला आहे.

वर्षभरात शाळेकडून प्रसंगानुरुप तसेच शालेय सहशालेय उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. पहिले शैक्षणिक सत्र संपल्यानंतर १७ दिवसांच्या दिपावली सुट्ट्या मिळाल्या. त्यानंतर सोमवारी ( दि. ३ ) रोजी द्वितीय सत्रात प्रारंभ झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी करण्यात आली. चिमुकल्यांकडून ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात आला. त्यानंतर प्लास्टिकच्या बाटल्या, विविध खाद्यपदार्थांच्या वस्तूचे वेष्टन, छोट्या पुड्या, रॅपर्स, रिकाम्या पाणी बॉटल्स, प्लॉस्टिकचे ग्लास, पाणी पाऊच, कॅरीबॅग, इतर प्लास्टिक वेस्टेजेस अशाप्रकारच्या कचऱ्याला एकत्रित करून जाळून नष्ट करण्यात आले.

# चांडोली बुद्रुक येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील चांडोली बुद्रुक येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहाची सुरुवात बुधवार दि. ५ रोजी तर सप्ताहाचा समारोप बुधवार दि.१२ रोजी होणार आहे.अशी माहिती मंचर बाजार समितीचे संचालक संदीप थोरात यांनी दिली. अखंड हरिनाम सप्ताहामध्ये बुधवार दि.५ रोजी रमेश महाराज थोरात,गुरुवार दि.६ रोजी भिकू महाराज आनंदराव, शुक्रवार दि.७ रोजी सागर महाराज शिर्के, शनिवार दि.८ रोजी पोपट महाराज राक्षे, रविवार दि.९ रोजी अनिल महाराज तुपे, सोमवार दि.१० रोजी नेहाताई भोसले, मंगळवार दि.११ रोजी कविराज महाराज झावरे यांचे कीर्तन होणार असून बुधवार दि.१२ रोजी चंद्रकांत महाराज खळेकर यांचे काल्याचे कीर्तने होणार आहेत. प्रत्येक दिवशी सकाळी ८ ते १२ हरिपाठ, प्रवचन व कीर्तन, सायंकाळी हरिजागर असे भक्तिमय कार्यक्रम होणार आहेत.

# बजाज फायनन्सने सणासुदीच्या कर्जांमध्ये २७% वाढ नोंदविली

**आर्थिक समावेशकतेला गती दिली; बजाज फायनॅन्सकडे पहिल्यांदा आलेले 52% ग्राहक पहिल्यांदाच कर्ज घेणारे कर्जदार आहेत**

**मुंबई/पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने आज सांगितले की, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात 27% आणि मूल्यात 29% जास्त होती.

ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जांमधील या वाढीतून सरकारच्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. उपभोक्त्याची खरेदी करण्याची क्षमता वाढविणे हेच या सुधारणांचे लक्ष्य होते.

22 सप्टेंबर ते 26 ऑक्टोबर 2025 या कालावधीत बजाज फायनॅन्सने अंदाजे 63 लाख कर्जे वितरित केली. या कालावधीत कंपनीने 23 लाख नवीन ग्राहक मिळवले, त्यापैकी 52% ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. अशाप्रकारे आर्थिक समावेशकतेत कंपनीने लक्षणीय प्रगती केली आहे.

बजाज फायनन्सचे अध्यक्ष संजीव बजाज म्हणाले, “सरकारने केलेल्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांमुळे भारताच्या उपभोग-केंद्रित विकास गाथेला एक नवीन रेटा मिळाला आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू अधिक किफायतशीर बनवून सदर उपाययोजनांनी मध्यम आणि कमी उत्पन्न असलेल्या कोट्यावधी कुटुंबांना सणासुदीच्या मोसमात आत्मविश्वासाने खरेदी करण्याचे बळ दिले. हा सकारात्मक प्रभाव केवळ उपभोक्ता कर्ज वितरणात झालेल्या 27% वाढीतून दिसत नाही, तर अधिक चांगल्या जीवनशैलीसाठी उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांकडे वळण्याच्या ग्राहकांच्या वृत्तीमधून देखील दिसतो.” ते पुढे म्हणाले, "या सणासुदीच्या मोसमात आमच्याकडे आलेल्या नवीन ग्राहकांपैकी अर्ध्याहून जास्त ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते.

आपले पहिले कर्ज या औपचारिक आर्थिक प्राणलीमधून घेण्याचे त्यांनी पसंत केले. बजाज फायनन्सचे डिजिटल प्लॅटफॉर्म आणि देशभरातील 4200 ठिकाणी असलेल्या 239,000 सक्रिय वितरण केंद्रांच्या उपस्थिती सह आम्ही आर्थिक समावेशकता अधिकाधिक रुजवण्याचा आणि भारतीय उपभोक्त्याच्या उत्थानाला बळ देण्याचा प्रयत्न करत आहोत.”

टेलिव्हिजन आणि एअर कंडिशनर्सवरील कमी GST मुळे ग्राहक आपल्या कर्जांच्या सरासरी तिकीट साइझमध्ये 6% घट करू शकले आहेत आणि त्याचबरोबर उच्च गुणवत्तेची उत्पादने खरेदी करू लागले आहेत. टेलिव्हिजनसाठी देण्यात आलेल्या कर्जात प्रीमियमायझेशनचा ट्रेंड स्पष्ट दिसून आला आहे. कंपनीने टीव्हीसाठी दिलेल्या एकूण कर्जांपैकी 71% कर्जं 40-इंच किंवा त्यापेक्षा मोठ्या स्क्रीनच्या टीव्हीसाठी आहेत. गेल्या वर्षी हे प्रमाण 67% होते. एक वैविध्यपूर्ण, टेक-प्रेरित नॉन-बँकिंग कंपनी असलेल्या बजाज फायनॅन्सचे लक्ष निरंतर इनोव्हेशनवर केंद्रित आहे, जेणेकरून ग्राहकांची कर्जापर्यंतची पोहोच वाढावी आणि ग्राहक व व्यवसाय यांना कर्जाचा चांगला अनुभव मिळावा.

या आघाडीच्या उपभोक्ता कर्ज प्रदाता कंपनीची मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक्स, घरगुती उपकरणे, फर्निचर, रूफटॉप सोलर पॅनल्स आणि इतर अनेक उपभोक्ता-केंद्रित श्रेणींमध्ये लक्षणीय उपस्थिती आहे.

# पिंपरखेड परिसरात नर बिबट्या ठार : कारवाईला यश

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर परिसरात निर्माण झालेल्या बिबट्यांच्या दहशतीला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पिंपरखेड (ता.शिरूर) परिसरात वनविभागाने राबवलेल्या नियोजनबद्ध मोहिमेत नर बिबट्याला गोळी घालून ठार करण्यात यश आले. या कारवाईनंतर ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असून वनविभागाच्या या धाडसी मोहिमेचं सर्वत्र कौतुक होत आहे. गेल्या दीड महिन्यांत या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये चार निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे परिसरात भीतीचं आणि अस्वस्थतेचं वातावरण निर्माण झालं होते.नागरिकांकडून वारंवार ठोस कारवाईची मागणी होत होती.अखेर पिंपरखेड व जांबुत ग्रामस्थांच्या आंदोलनानंतर, तसेच माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी बिबट्याला ठार करण्यास परवानगी दिली.परवानगी मिळाल्यानंतर वनविभागाने तज्ज्ञ शूटरसह विशेष पथक तयार केले. या पथकाने मंगळवारी उशिरा रात्री पिंपरखेड परिसरात शोध मोहीम राबवत नर बिबट्याला ठार करण्यात यश मिळवले. गेल्या दहा वर्षांत प्रथमच अशा प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. वनविभागाच्या या मोहिमेत स्थानिक पथकासोबत तज्ज्ञ शूटरचाही सहभाग होता.



"आमच्या कर्मचाऱ्यांनी भीतीच्या वातावरणात अत्यंत धैर्याने काम केले. नागरिकांचा जीवितहानीचा धोका टळावा, यासाठी पुढील काही दिवस परिसरात गस्त आणि शोधमोहीम सुरू ठेवली जाणार आहे."गेल्या काही दिवसांत वनविभागाने दहा बिबट्यांना जेरबंद करण्यात यश मिळवलं असून ही कारवाई नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीचं सावट दूर करण्यात मदत करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


**- स्मिता राजहंस,सहायक वनसंरक्षक.**



गायमुख चौकात 21 तास बिबट्यांच्या दहशतीच्या विरोधात ठिय्या आंदोलन.प्रशासनाची चर्चेनंतर आंदोलन मागे. या बातमीसोबत दिलेले छायाचित्र बरोबर आहे.परंतु त्याचे छायाचित्र ओळी चुकल्या आहे. मंचरजवळील गायमुख नंदी चौक येथिल रस्त्यावर विविध मागण्यासाठी झोपलेले आंदोलक आणि उपस्थित ग्रामस्थ या प्रमाणे घ्यावे.

## थोडक्यात बातम्या...

### सावेडीतील रहिवासी अथर्व कुलकर्णी यांचे निधन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी येथील रहिवासी अथर्व गिरीश कुलकर्णी (वय 26) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे आई, बहीण, काका, काकू, आजी असा परिवार आहे. अथर्व कुलकर्णी हा अतिशय तरुण व मनमिळावू स्वभावाचा होता. सावेडीतील गरजू व वयस्कर लोकांना तो कायम विविध प्रकारे मदत करीत असे. तरुण वयात त्याचे आकस्मिक निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. केडगाव येथील राकेश शामराव कुलकर्णी व शिरीष शामराव कुलकर्णी यांचा तो पुतण्या होय.

### महाविकास आघाडी आणि महायुती-आघाडीत समन्वयाचा अभाव

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीची स्थापना झाल्यानंतर प्रथमच नगरसेवक आणि नगराध्यक्षपदाची निवडणूक होत असल्याने शहरात राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. मंगळवार दि. ४ रोजी निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर आता प्रचारयुद्धाची सरशी दिसू लागली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांमध्ये समन्वय राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सद्यस्थितीत 'एकला चलो रे'चा सूर विविध पक्षांकडून ऐकू येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) विरोधात इतर पक्ष एकत्र येण्याची प्राथमिक चिन्हे दिसत आहेत. जर महायुतीकडून एकास एक उमेदवार दिला गेला, तर निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता आहे. परंतु महायुतीत अंतर्गत मतभेद आणि समन्वयाचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. अनेक इच्छुकांनी आधीच गुडघ्याला बाशिंग बांधल्याने 'महायुतीचा धर्म पाळला जाईल का?' असा प्रश्न कार्यकर्त्यांमध्ये उपस्थित होत आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून अनेक इच्छुक उमेदवार आहेत. त्यामुळे उमेदवारी ठरविताना पक्षाला अंतर्गत समतोल साधावा लागणार आहे. दुसरीकडे भाजपलाही स्थानिक पातळीवर आपला प्रभाव राखण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. या दोन्ही पक्षांच्या निर्णयांवरच महाविकास आघाडीचे आणि महायुतीचे आगामी चित्र अवलंबून राहणार आहे.दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटाने नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी स्वतंत्र उमेदवार देण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे मंचरमध्ये महायुतीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यात महायुती असली तरी स्थानिक पातळीवर तिच्यातील बिघाडीमुळे आगामी निवडणूक अधिक चुरशीची होण्याची पूर्ण शक्यता निर्माण झाली आहे.

### तालुकाध्यक्षपदी दीपक पोखरकर, कार्याध्यक्षपदी उत्तम टाव्हरे

मंचर (स. गांवकरी) : अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या आंबेगाव तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली असून तालुकाध्यक्षपदी पिंपळगाव खडकीचे सरपंच दीपक पोखरकर यांची तर कार्याध्यक्षपदी टाव्हरेवाडीचे माजी सरपंच उत्तमराव टाव्हरे तसेच नागापूरचे सरपंच गणेश यादव यांची पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. निवड अखिल भारतीय सरपंच परिषदेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जयंत पाटील यांच्या सूचनेनुसार राज्याचे उपाध्यक्ष व पुणे जिल्हा अध्यक्ष शशिकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. निवड झालेल्या मान्यवरांचा सत्कार तरवडे उद्योग समूहाचे प्रमुख अविनाश तरवडे व शशिकांत मोरे यांच्या हस्ते करण्यात आला.या वेळी मोरे म्हणाले की, "तालुक्यातील सरपंचांचे संघटन मजबूत करून त्यांच्या समस्या समजून घेणे, नवनवीन योजना राबविण्यासाठी प्रयत्न करणे आणि समाजहितासाठी एकत्रितपणे काम करणे हेच परिषदेचे उद्दिष्ट आहे."

### आचारसंहितेची अंमलबजावणी, फ्लेक्स काढण्याची मोहीम सुरू



मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठीची आचारसंहिता अधिसूचना मंगळवार दि. ४ रोजी जारी झाली असून मंगळवार दि.२ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध राजकीय पक्ष, संभाव्य उमेदवार तसेच दीपावलीच्या निमित्ताने लावण्यात आलेले दुकानदारांचे फ्लेक्स, पोस्टर आणि बॅनर काढण्याचे काम बुधवार दि.५ पासून सुरू करण्यात आले. नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक प्रशासनाने एकत्रित कारवाई करत आतापर्यंत सात ट्रॅक्टर फ्लेक्स, बॅनर आणि होर्डिंग्ज काढण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शहरात निवडणुकीचे वातावरण तापले असून नागरिकांना कोणत्याही प्रकारे नियमभंग न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने सर्व राजकीय पक्ष, कार्यकर्ते आणि नागरिकांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी नगरपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन मंचर नगरपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद जाधव यांनी केले आहे. या निवडणुकीत एकूण १७ प्रभागांसाठी मतदान होणार आहे. मंचर नगरपंचायत निवडणुकीची आचारसंहिता लागू.निवडणूक वेळापत्रक.अर्ज दाखल करणे-10 नोव्हेंबर ते 17 नोव्हेंबर,अर्जांची छाननी-18 नोव्हेंबर,अर्जांची माघार-21 नोव्हेंबर,उमेदवारांना चिन्ह वाटप- 26 नोव्हेंबर,मतदान दिनांक-2 डिसेंबर 2025,मतमोजणी दिनांक- 3 डिसेंबर 2025,राजपत्र प्रसिद्ध होणार-10 डिसेंबर 2025 ऑनलाइन उमेदवारी अर्ज दाखल होणार.

# भारतीय जनता पक्षात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांचा मोठा प्रवेश

■ दिवाळी फराळ स्नेह मिलन कार्यक्रमात झाला ऐतिहासिक क्षण

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील राजकीय समीकरणांमध्ये नवा अध्याय लिहिला गेला आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने उत्सव मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी फराळ स्नेह मिलन' या भव्य कार्यक्रमात काँग्रेस पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून शहरातील राजकारणाला नवी दिशा दिली. या प्रवेश सोहळ्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, भाजपच्या संघटनात्मक बळकटीला नवसंजीवनी मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,दिलीप भालसिंग यांच्या सह तालुका व शहर पदाधिकारी, तसेच शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन दिवाळीच्या पार्श्वभूमीवर 'स्नेह मिलन' स्वरूपात करण्यात आले होते. या सोहळ्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नारायणराव डावखर, शहराच्या पहिल्या महिला नगराध्यक्षा इंदुमतीताई डावखर, रोहन डावखर यांच्यासह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्याचबरोबर माजी नगरसेविका हेमा गुलाटी, रवींद्र गुलाटी, राजेश अलघ, महाराज कंट्रोल, बंटी गुप्ता आणि त्यांचे कार्यकर्ते यांनीदेखील भाजपचा झेंडा हातात घेतला. या मोठ्या राजकीय प्रवेशामुळे शहरातील काँग्रेसच्या संघटनावर परिणाम होणार असल्याचे निरीक्षकांचे मत आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अब्दुल भाई शेख, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, महिला शहराध्यक्ष स्वाती चव्हाण यांच्यासह भाजप नेते दीपक पठारे, संजय फंड, बंडूकुमार शिंदे, मारुती बिंगले, श्रीनिवास बिहानी, सतीश सौदागर, रुपेश हरकल, विशाल अंभोरे, महेंद्र पठारे, शरदराव नवले, केतन खोरे, संजय गांगड, आशिष धनवटे, रवी पाटील, दीपक चव्हाण, अर्जुन दाभाडे, वैशालीताई चव्हाण, पूजा चव्हाण, मंजुश्रीताई ढोसावळे, पुष्पा हरदास, अक्षय गाडेकर, महेश सूळ, श्रेयस झिंरगे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, भाजप ही सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी कार्य करणारी आणि विकासाचा मार्ग दाखवणारी पक्षसंस्था आहे. श्रीरामपूर शहर आणि तालुक्याच्या विकासासाठी आपण सर्वजण एकदिलाने काम करू. नवीन प्रवेश केलेल्या सर्व मान्यवरांचे पक्षात स्वागत आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग विकासकार्यासाठी होईल, असे ते म्हणाले. दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने आयोजित या स्नेह मिलन कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा देत परस्पर स्नेह वृद्धिंगत केला. कार्यक्रमात पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून सामील झालेल्या कार्यकर्त्यांमुळे पक्षाला निश्चितच नवे बळ मिळेल, असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला.

सांस्कृतिक रंगतही या कार्यक्रमात होती. जिल्ह्यातील गायक, वादक आणि कलाकारांनी हिंदी व मराठी गीते सादर करून उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सुरेल मैफलीने संपूर्ण वातावरण रंगून गेले आणि कार्यक्रम अधिक आकर्षक ठरला. राजकीय विश्लेषकांच्या मते, श्रीरामपूरमधील डावखर परिवार व इतर नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश हा येत्या नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांपूर्वीचा निर्णायक टप्पा ठरू शकतो.



# दोन महिन्याच्या वासराचा बळी, परिसरात भीतीचे सावट

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव-खडकी येथे बिबट्याच्या दहशतीत सातत्याने वाढ होत असून बुधवार दि.५ रोजी पहाटे लिंबाचामळा परिसरात दोन महिन्याच्या वासराला बिबट्यांने ठार केले.त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. शिवाजी मारुती बांगर यांच्या गोठ्यातील दोन महिन्याच्या वासरावर बिबट्याने झडप घालून त्याचा जागीच बळी घेतला.घटनेनंतर बिबट्याने वासराचे मांस फस्त केल्याचे आढळले. या ठिकाणी शेजारीच उसाचे दाट पीक असल्याने बिबट्या त्यात दबा धरून बसल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.स्थानिक महिलांनी सांगितले की, उसाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात बिबट्याचा आवाज येत असल्याने संपूर्ण परिसरात दहशत निर्माण झाली आहे.महिला आणि लहान मुले यांना भीतीमुळे घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. या घटनेची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांना कळताच त्यांनी तत्काळ वन विभागाला दिली. माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पिंजरा लावण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बिबट मानव संघर्ष कमी करण्यासाठी ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर

**माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची माहिती**

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मागील काही वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांमध्ये मानव-बिबट्या संघर्षाची परिस्थिती गंभीर बनली आहे.

बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि मानवी वस्त्यांमध्ये त्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील पाच वर्षांत झालेल्या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. नुकत्याच झालेल्या हल्ल्यांत एका १३ वर्षीय चिमुरड्याचा, तसेच एका वृद्ध महिलेसह लहान मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी तातडीची दखल घेत बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी आणि मानव-बिबट संघर्षावर नियंत्रण आणण्यासाठी तब्बल ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

अशी माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मंगळवार दिनांक चार रोजी दिली. पुणे जिल्ह्यातील उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरुर या तालुक्यात ऊसाचे क्षेत्र, पाण्याच्या मुबलकतेसह अनुकुल वातावरणामुळे गेल्या काही वर्षात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे या भागात बिबट्या आणि नागरिकांच्यात सातत्याने संघर्ष होत आहे. याला पायबंद घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी आंबेगावचे स्थानिक आमदार, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या मंजूर निधीतून जुन्नर वनविभागाच्या कार्यक्षेत्रात २० विशेष रेस्क्यू टीम कार्यरत होणार असून प्रत्येक टीममध्ये प्रशिक्षित नेमबाज, शोधक, ट्रँक्युलायझिंग गन, रेस्क्यू वाहने, अत्याधुनिक कॅमेरे, पिंजऱ्यांसह आवश्यक उपकरणांचा समावेश असेल. या मोहिमेत ५०० पिंजरे, २० ट्रँक्युलायझिंग गन, ५०० ट्रॅप कॅमेरे, २५० लाईव्ह कॅमेरे, ५०० हाय-पॉवर टॉर्च, ५०० स्मार्ट स्टिक, २० मेडिकल इक्विपमेंट किट्स यांसह प्रत्येक टीमसाठी ५-६ प्रशिक्षित सदस्य असणार आहेत.

# विज्ञान विभागासाठी विशेष ओपीडी सेवा सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांनी आज गॅस्ट्रोहब हॉस्पिटल, पुणे यांच्या सहकार्याने हिपॅटोबिलियरी, स्वादुपिंड (पॅनक्रियाटिक) आणि आतड्यांसंबंधित (इंटेस्टायनल) ओपीडी सेवा सुरू केल्याची घोषणा केली. या सेवांचा शुभारंभ डॉ. गौरव चौबल, संचालक – एचपीबी सर्जरी, लिव्हर आणि मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट, नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांच्या उपस्थितीत झाला. या ओपीडी सेवांचा उद्देश म्हणजे यकृत, आतडे आणि स्वादुपिंडाशी संबंधित आजारांनी ग्रस्त रुग्णांना तज्ज्ञ सल्ला व अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच वेळीच निदान आणि घराजवळ विशेष उपचार मिळवून देणे हा आहे.





डॉ. गौरव चौबल हे गॅस्ट्रोहब हॉस्पिटल, पुणे येथे दर शुक्रवारी सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत प्राथमिक सल्लामसलत आणि फॉलो-अपसाठी उपलब्ध राहतील. लवकर निदान आणि उपचाराच्या महत्त्वावर भर देताना, डॉ. गौरव चौबल, संचालक – एचपीबी सर्जरी, लिव्हर आणि मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट, नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांनी सांगितले की, "यकृत, स्वादुपिंड आणि आतड्यांचे विकार हे गंभीर आरोग्यधोका निर्माण करतात. वेळेवर उपचार न झाल्यास ते लिव्हर फेल्युअरसारख्या गुंतागुंतींना कारणीभूत ठरू शकतात. आनुवंशिक प्रवृत्ती, निष्क्रिय जीवनशैली आणि पर्यावरणीय घटकांमुळे भारतातील अनेक भागांमध्ये तीव्र आणि दीर्घकालीन यकृतविकारांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. पुण्यात सुरू झालेल्या या विशेष ओपीडी सेवांद्वारे, आम्ही उच्च-जोखमीच्या प्रौढ आणि बालरुग्णांची तपासणी करून, वेळेवर उपचार देण्याचे आणि प्रदेशातील हेपॅटो-पॅन्क्रिएटो-बिलिअरी आरोग्याचे दर्जा सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे."

# आंदोलनात सहभाग नोंदवत लाल फित लावून कामकाज

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

घोडेगाव वकील बार असोसिशन यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा यांच्या वतीन अॅडव्होकेट प्रोटेक्शन बिल करिता पुकारलेल्या आंदोलनात सहभाग नोंदवत लाल फित लावून कामकाज चालवले. न्यायलयामध्ये न्यायालयीन कामासाठी येणा-या लोकांना त्रास होऊ नये.यासाठी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा यांनी कामकाजापासून अलिप्त राहण्याचा रहित करून लाल फीत लावून न्यायालयीन कामकाज करण्याचा निर्देश दिले. त्याप्रमाणे वकील संघटनेच्या सदस्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा आदेशाचे पालन करून आंदोलनात सहभागी घेवून न्यायालयीन कामकाज केले. न्यायालयाच्या प्रवेश द्वारा समोर लाल फित लावून निदर्शन करून आंदोलनात सहभागी झाले व कामकाज केले व अॅडव्होकेट प्रोटेक्शन बिल संमत करून अॅडव्होकेट प्रोटेक्शन कायदा तातडीने लागू करण्यात यावी.

# वाधवा, शाह आणि शर्मा ठरले 'एसबीआय लाईफ आयडिएशनएक्स २.० नॅशनल चॅम्पियन'

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने भारतीय जीवन विमा उद्योगासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एका उपक्रमाचे आयोजन केले होते. 'आयडिएशनएक्स 2.0' चा ग्रँड फिनाले नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला. मुंबईतील एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (एसपीजेआयएमआर) येथील प्रीतिश वाधवा, स्तुती राजेश शाह आणि एशान शर्मा या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी यात बाजी मारली आणि ते आयडिएशनएक्स 2.0 चे विजेते ठरले. भारतातील टॉप 100 बी-स्कूलमधील 31,000+ विद्यार्थ्यांचा या उपक्रमात सहभाग होता. जीवन विम्याचे भविष्य पुन्हा परिभाषित करू शकतील अशा कल्पनांचे एकत्रीकरण व्हावे यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते.





भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते अभिनव बिंद्रा हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करण्यासोबतच, एकाग्रता, चिकाटी आणि आत्मविश्वास याबाबत त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचा स्वतःचा प्रवास समोर मांडत सातत्य, नवीन काही शिकण्यासाठी तयार असणे तसेच आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट होण्यासाठी स्वतःच्या कमजोरींवर मात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आयडिएशनएक्सच्या संकल्पनेमागे नवोन्मेष आणि प्रगतीचे हेच तत्त्व आहे.

युवा नवोन्मेष मंच म्हणून सुरू करण्यात आलेला एसबीआय लाईफचा हा प्रमुख उपक्रम आहे. जीवन विमा क्षेत्रात प्रत्यक्षात भेडसावणारी आव्हाने सोडवण्यासाठी नावीन्यपूर्ण कल्पनांना चालना देणे ही आयडिएशन एक्सची मूळ संकल्पना आहे. या उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षात देशभरात याचा विस्तार झाला. आणि भारतातील सर्वात गतिमान उद्योग-शैक्षणिक सहयोगी म्हणून आपले स्थान मजबूत केले. हजारो प्रवेशिकांमधून अंतिम फेरीत आठ संघ पोहोचले. एसबीआय लाईफचे एमडी आणि सीईओ श्री. अमित झिंग्रान यांच्यासमोर त्यांच्या कल्पना सादर केल्या. यावेळी श्री एम. आनंद, प्रेसिडंट आणि चीफ डिस्ट्रिब्युशन ऑफिसर; श्री. अभिजित गुलाणीकर, प्रेसिडंट - बिझनेस स्ट्रॅटेजी; श्री. जी. दुर्गादास, अध्यक्ष - ऑपरेशन्स आणि आयटी; आणि श्री. रवींद्र शर्मा, चीफ ऑफ ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स आणि सीएसआरचे प्रमुख आदी कंपनीचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. आयआयएम शिलाँगमध्ये दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या नमिता गुप्ता, नीतिका बन्सल आणि साक्षी अग्रवाल यांनी दुसरा क्रमांक पटकावला तर तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. अहमदाबाद येथील एमआयसीए मधील ऐश्वर्य सिंग, अदिती पांडे आणि आदित्य जैन तसेच आयआयएम लखनऊ येथील चैतन्य गुप्ता, प्राची दमानिया आणि आकाश भानसे हे दोन्ही संघ आयडिएशनएक्स 2.0 चे तृतीय विजेते ठरले.

या उपक्रमाचा उद्देश अधोरेखित करताना एसबीआय लाईफ इन्शुरन्सचे ब्रँड, कॉर्पोरेशन कम्युनिकेशन आणि सीएसआर प्रमुख श्री. रवींद्र शर्मा म्हणाले, "भारत एका अशा वळणावर उभा आहे जिथे नवोपक्रम आणि समावेशन हे आर्थिक सुरक्षेची पुनर्परिभाषा करतात. उद्योगाची प्रगती ही नेहमीच अनुभवासोबतच विचारांच्या वेगळ्या दृष्टिकोनावर अवलंबून असते, यावर आमचा विश्वास आहे. व्यक्तींना आत्मविश्वासाने आणि जबाबदारीने त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यास सक्षम करणाऱ्या सुलभ तंत्रज्ञानाची देखील यात महत्त्वाची भूमिका आहे.